| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २५४ वा | मंगळवार दिनांक २३ डिसेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत समीर रा. तामलवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२१.१२.२०२५ मा. जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी धाराशिव यांचे शस्त्र बंदी आदेशाचे उल्लघन करुन लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक तलवार ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला तामलवाडी पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे- उमेश सुरेश माने, नेमणुक पोलीस ठाणे तामलवाडी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह भा.न्या.सं.कलम १३५ मपोका अन्वये तामलवाडी पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### तीन मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दशरथ शेतीबा धोतरे, वय ३८ वर्षे, रा. तुळजापूर नाका पापनाश नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची ५०,००० किंमतीची काळ्या रंगाची मोटरसायकल ही ओम मंगलकार्यालयाचे समोर धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दशरथ धोतरे यांनी दि.२१.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी चंद्रशेखर महादेव सोमवंशी, वय ३२ वर्षे, आरणी ता. लोहारा जि.धाराशिव यांची अंदाजे ६०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.१४.१२.२०२५ रोजी भंडारी गावच्या हद्दीत असलेले समाधान धाब्यासमोरुन येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-चंद्रशेखर सोमवंशी यांनी दि.२१.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे महारुद्र बाबुराव वैद्य, वय ३५ वर्षे, रा.मेडसिंगा ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ३५,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.२९.११.२०२५ रोज महारुद्र वैद्य यांचे किराणा दुकानासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-महारुद्र वैद्य यांनी दि.२१.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत कैलास रा. पारधीवस्ती दसमेगाव ता. वाशी हे दि.२१.१२.२०२५ रोजी आपल्या ताब्यातील मोटरसायकल ही येडशी टोल प्लाझा एनएच ५२ रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलमाचे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्ह्यासाठी ५०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय

### आरोग्य संचालक डॉ.नितीन अंबाडेकर यांनी केली जागेची पाहणी



धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित असलेल्या ५०० खाटांच्या अत्याधुनिक नवीन जिल्हा रुग्णालयाच्या उभारणीस गती मिळाली आहे.आरोग्य सेवा संचालक, मुंबई डॉ. नितीन अंबाडेकर यांनी आज जिल्ह्याला भेट देऊन नवीन रुग्णालयासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेची सविस्तर पाहणी केली.या दौऱ्यादरम्यान त्यांनी प्रस्तावित इमारतीचा नकाशा,विविध विभागांची रचना तसेच वॉर्डनिहाय नियोजनाचा सखोल आढावा घेतला.

भविष्यातील वाढत्या आरोग्य गरजांचा विचार करून नियोजन करण्यात येत असून,नवीन रुग्णालय इमारतीमध्ये सर्व अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. पाहणीदरम्यान डॉ.अंबाडेकर यांनी रुग्णालय उभारणीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी,जागेची उपयुक्तता तसेच भविष्यातील विस्तार लक्षात घेऊन महत्त्वपूर्ण सूचना केल्या.जिल्ह्यातील रुग्णांना एकाच छताखाली सर्व उपचार सुविधा मिळाव्यात तसेच अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा समावेश करण्यात यावा,यावर त्यांनी विशेष भर दिला.

या आढावा बैठकीस उपसंचालक आरोग्य सेवा (लातूर परिमंडळ) डॉ. रेखा गायकवाड,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर,तसेच आरोग्य विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अभियंता व कर्मचारी उपस्थित होते.

संचालकांनी जागेची उपयुक्तता, रुग्णांच्या दळणवळणाच्या दृष्टीने सोयीस्कर स्थान आणि भविष्यातील विस्तारासाठी पुरेशी जागा उपलब्ध असल्याबाबत निरीक्षण नोंदविले. तसेच नवीन इमारतीच्या नकाशा (फ्लोअर प्लॅन) तपासणीदरम्यान बाह्यरुग्ण विभाग (OPD),अतिदक्षता विभाग (ICU),शस्त्रक्रिया गृह (OT), प्रशासकीय कक्ष यांचे योग्य नियोजन करण्याबाबत तांत्रिक सूचना दिल्या.

रुग्णालयामध्ये औषधवैद्यकशास्त्र, स्त्रीरोग,बालरोग,अस्थिव्यंग तसेच इतर विशेष विभागांसाठी आवश्यक खाटांची संख्या,वॉर्डनिहाय पायाभूत सुविधा,वीज व पाणीपुरवठा तसेच सांडपाणी व्यवस्थापन (STP) व्यवस्था सक्षम करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

तसेच रुग्णालयाची इमारत 'रुग्णस्नेही' (Patient Friendly) असावी,नैसर्गिक प्रकाश व हवा खेळती राहील अशा पद्धतीने खिडक्यांची रचना करावी, आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांची ने-आण सुलभ व्हावी यासाठी रॅम्प व लिफ्टची पुरेशी व्यवस्था करावी आणि बांधकाम सुरू करण्यापूर्वी सर्व तांत्रिक व प्रशासकीय मान्यतांची तातडीने पूर्तता करावी,अशा महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

ही आढावा बैठक शासकीय विश्रामगृह,शिगोंली येथे झाली. कामाच्या नियोजनाबाबत समाधान व्यक्त करत,प्राप्त सूचनांनुसार आवश्यक बदल व पुढील कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करण्याच्या सूचना संचालकांनी यावेळी दिल्या.

## धाराशिव, भूम, कळंब नगर परिषदेत आदिवासी पारधी समाजातील रणरागिणींना जनतेचा कौल



धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव जिल्ह्यातील आठ नगर परिषदेच्या निवडणुकीत आरक्षित जागेवर आदिवासी पारधी समाजातील रणरागिणींना जनतेने कौल देवून भरघोस मतांनी विजयी केले आहे. समाजातील उमेदवारांच्या प्रचारासाठी जीवाचे रान करणारे आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे हे या निवडणुकीत गेमचेंजर ठरले आहेत. या यशाबद्दल नूतन नगराध्यक्षा नेहा राहुल काकडे, वंदना बापू पवार, शालाबाई शिवा पवार, सुरेखा दत्ता काळे यांचा सुनील काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

धाराशिव नगर परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार सौ.वंदना बापू पवार यांनी मोठे मताधिक्य घेवून दणदणीत विजय मिळविला आहे. भूम नगर परिषदेत सुरेखा दत्ता काळे, कळंब नगर परिषदेत शालाबाई शिवा पवार यांनीही घवघवीत यश मिळवत नगरसेविका झाल्या आहेत. त्याचबरोबर धाराशिव नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार नेहा राहुल काकडे आणि प्रभागातील भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी देखील आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे यांनी जीवाचे रान केले होते. त्यामुळे आदिवासी पारधी समाज भारतीय जनता पार्टीसोबत असल्याचे या निवडणुकीत दिसून आले.

नगरपरिषद निवडणुकीत मिळालेल्या भरघोस यशानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेविकांचा आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे यांच्या हस्ते पुष्पहार, पुष्पगुच्छ देवून पेढे भरवून सत्कार करण्यात आला. यावेळी भूम, कळंब, धाराशिव येथील बांधवांनी सुनील काळे यांचा शाल, श्रीफळ व फेटा बांधून सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक बापू पवार यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वाधार योजनेस अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ

धाराशिव, (जिमाका ) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या तसेच वसतिगृह प्रवेशासाठी रीतसर अर्ज केलेल्या,मात्र शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी,१२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे, यासाठी भोजन भत्ता,निवास भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे.तसेच ही योजना तालुकास्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही लागू आहे. त्यानुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ करिता https://hmas.mahait.org या पोर्टलवर अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ अशी निश्चित करण्यात आली होती.मात्र ऑनलाईन प्रणालीवर अर्ज करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी,तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र उशिरा सुरू होणे आदी बाबींचा विचार करता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ साठी अर्ज करण्याची मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ करिता जिल्ह्यातील नगरपालिका हद्दीतील तसेच सर्व तालुका नगरपालिका/नगरपरिषद हद्दीतील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांपैकी ज्यांनी अद्याप अर्ज सादर केलेला नाही,अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेकरिता ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.तसेच ऑनलाईन अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्रांसह हार्डकॉपी समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे जमा करावी.

स्वाधार योजनेचा लाभ जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

## डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान संपन्न



कळंब (प्रतिनिधी)- शिवसेवा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचालित छत्रपती शिवाजी महाविद्यालय,कळंब ,आयक्यूएसी विभाग व श्री.शिवाजी शिक्षण संस्था,द्वारा संचालित महात्मा फुले कला,वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय,वरुड जि. अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठिक १०:०० वा. 'क्रांतीदर्शी डॉ.पंजाबराव देशमुख यांची समग्र क्रांती व भारतीय संविधानातील योगदान' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करण्यात आले होते. प्रथम कार्यक्रमाची सुरवात कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा.डॉ.राजेश मिरगे(संत साहित्य व शिवचरित्र अभ्यासक,श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती) मा.प्रा.डॉ.दिलीप हांडे (प्राचार्य,महात्मा फुले कला वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरूड) संस्थेचे सहसचिव प्रा. संजयजी घुले,कार्यक्रमाचे कार्यक्रमाध्यक्ष मा.प्रा.डॉ. हनुमंत माने (प्राचार्य, छत्रपती शिवाजी महाविद्यालय कळंब)प्रा.कदम सर, आयक्युएसीसमन्वयक डॉ. अनिल जगताप व रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. मनिषा कळसकर या मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.पंजाबराव देशमुख व संस्थेचे संस्थापक कै. नरसिंग (आण्णा)जाधव यांच्या प्रतिमांचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांचा यशोचित सत्कार महाविद्यालयाच्या वतीन करण्यात आला.महात्मा फुले कला,वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य.प्रा. डॉ.दिलीप हांडे यानी त्यांच्या महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे सहसचिव प्रा.संजयजी घुले व प्राचार्य. डॉ.हनुमंत माने याना डॉ. पंजाबराय देशमुख यांची प्रतिमा व ग्रंथ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.राजेश मिरगे यानी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या राजकीय,सामाजिक,कृषि तसेच शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यांचे तसेच त्यांचे विचार या विषयी सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य.डॉ.दिलीप हांडे यानी केले.त्यानी या कार्यक्रमाच्या उद्देशाविषयी प्रास्ताविक केले. कार्यकमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. हनुमंत माने यांनी केला.सुंदर असे सुत्रसंचालन प्रा.मनिषा कळसकर यानी केले.आभार प्रा.राजाभाऊ चोरघडे यानी मानले.यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## श्री कुलस्वामिनी आश्रमशाळा जळकोट येथे राष्ट्रीय गणित दिवस साजरा



जळकोट (विजय पिसे)- दिनांक: २२ डिसेंबर २०२५ वार सोमवार रोजी श्री कुलस्वामिनी प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा जळकोट ता.तुळजापूर जि. धाराशिव या शाळेच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. सुरवातीला भारतीय गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पुजन इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी कुमारी मोनिका चव्हाण कुमारी नेहा राठोड व कार्यक्रमाचे अध्यक्ष नागेंद्र गुरव सर प्रमुख पाहुणे श्री कुलस्वामिनी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय श्रीमती आशा पवार मॅडम, श्रीमती प्रा ज्योतिका चव्हाण मॅडम, प्राथमिक आश्रम शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती शांताबाई चौगुले मॅडम व प्रा अप्पासाहेब साबळे सर यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण कांबळे सर यांनी गणितीय दिनाचे महत्त्व विशद केले. आश्रम शाळेतील अनेक विद्यार्थी गणितीय दिनाबद्दल माहिती सांगितली. महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोटचे सचिव संतोष चव्हाण साहेब यांच्या वतीने प्राध्यापिका ज्योतिका चव्हाण मॅडम यांच्या हस्ते आश्रम शाळेतील गणित विषय शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. गणितीय शैक्षणिक साहित्यांचा प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा घेण्यात आले. श्रीमती शांताबाई चौगुले मॅडम यांनीही गणित विषय किती सोपा आहे हे आपल्या मनोगतात सांगितले .या कार्यक्रमाचे अध्यक्ष नागेंद्र गुरव सरांनी रामानुजन बद्दल खुप चांगल्या पध्दतीने माहिती सांगितले . गणिताचे उपयोग आपल्या जीवनात किती होऊ शकतो या बद्दल विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. शेवटी गणित शैक्षणिक साहित्यांचा प्रदर्शन भरवण्यात आले होते त्या प्रदर्शनाचा सर्व विद्यार्थ्यांनी गणित विषय किती सोपा आहे हे समजून घेतले. या कार्यक्रमाला प्रा. बालाजी राठोड, प्रा संतोष दुधभाते ,प्रा सुरेश कोकाटे , प्रा अश्विनी लबडे ,श्रीमती कल्पना लवंद मॅडम, कुमारी मयुरी कांबळे मॅडम, अभिजीत चव्हाण सर , खंडेराव कारले सर, बिळेणसिध्द हक्के सर, दुर्गेश कदम सर, सागर चव्हाण सर ,शंकरराव चव्हाण शिक्षकेत्तर कर्मचारी बालाजी अहंकारे, सुग्रीव देवकते उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रमिला कुंचगे मॅडम तर आभार देवानंद पांढरे सर मानले.अशा पध्दतीने आमच्या आश्रम शाळेत गणित दिन साजरा करण्यात आला.

## वाहतुक शाखेने १,२२,१०० 'तडजोड शुल्क' केली वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२१ डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १५९ कारवाया करुन १,२२,१०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भाजपाला मोठे यश, महिलांची मिळाली साथ?

महाराष्ट्रातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची निकाल जाहिर झाला. प्राप्त आकडेवारीनुसार, महायुतीचे सर्वाधिक २१३ नगराध्यक्ष निवडून आले असून, महाविकास आघाडीला अवघ्या ५० जागांवर समाधान मानावे लागले आहे. ११७ नगराध्यक्ष मिळवत भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. महाराष्ट्रात भाजपाचे १२९ नगराध्यक्ष विजयी झाले असून ३ हजारांपेक्षा जास्त नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपाला २०१७ पेक्षा मोठा विजय मिळाला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात हे मोठे यश मिळाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. भाजपने १२९ नगराध्यक्षपदावर विजय मिळवला असून महायुतीच्या तिघांचे मिळून जे नगराध्यक्ष आहेत ते ७५ टक्के आहेत. नगरसेवकपदावर भाजपने नवा रेकॉर्ड केला आहे. यापूर्वीच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे १६०२ नगरसेवक होते, आता त्याच्या दुपटीचे ३३०२ नगरसेवक आहेत. या बाबत देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी पूर्ण सकारात्मक प्रचार केला. सगळ्या सभांमध्ये मी विकासावर मत मागितली. तसेच आम्ही काय विकास करणार आहोत याची ब्ल्यु प्रिंट मांडली आणि याला लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. लोकांनी आमच्या विकास कामांवर दिलेली पावती आहे. आज देशात मोदींच्या नेतृत्वात भाजपबद्दल जी काही सकारात्मकता आहे याचा फायदा आम्हाला झालेला आहे. देवेंद्र फडणवीस असेही म्हणाले की, केंद्रीय नेतृत्वाने आमच्यावर ही जबाबदारी दिली होती. प्रत्येक विभागात आमचे जे नेते आहेत, चंद्रकांत दादा असतील, गिरीश महाजन असतील, मराठवाड्यातले नेते असतील, सर्वांनीच चांगले काम केले आहे. सगळ्या मंत्र्यांना आम्ही जी जबाबदारी दिली होती, ती देखील त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने निभावली आहे. हा विजय आमच्या सगळ्यांचा आहे. लोकांनी जो विश्वास आमच्यावर दाखवला आहे, त्यांच्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले. वास्तविक २०१४ पासून कोणतीही निवडणूक काढा, तेव्हा पासून झालेल्या सगळ्या निवडणुकीत भाजपने चांगला विजय मिळवला आहे आणि शहर आणि गावांच्या विकासावर आम्ही भर दिला आहे. भाजप हा सर्व जातींचा आहे आणि महाराष्ट्राचा नंबर १ पक्ष हा भाजपच आहे. रत्नागिरीमध्ये आम्ही महायुतीत लढलो तिथे आम्हाला चांगला यश मिळाले आहे, सिंधुदुर्गमध्ये युती नव्हती, तिथे आम्ही काही ठिकाणी हरलो, काही ठिकाणी जिंकलो. परंतु, आम्ही जिथे लढलो, तिथे आम्ही जिंकलोच आहोत. आता विरोधक हे सांगायला मोकळे आहेत की आम्ही या निवडणुका गांभीर्याने घेतल्या नाहीत, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे. वास्तविक तसे पाहिले तर याही निवडणुकीत महिलांनी साथ दिली आहे. लाडक्या बहिणींनी प्रामाणिक मदत केली आहे. हे मान्यच केले पाहिजे. देशात आलिककडील काळात म्हणजे नुकत्याच बिहारची निवडणुकीचे विश्लेषण केल्यास केवळ महिलांमुळे मोठा विजय भाजपाला अर्थात नितीशकुमार यांना मिळाला. याला पक्का पुरावा काय असे म्हणाल तर ते देणे शक्य नाही मात्र अनुमान चुकीचा नाही. ज्यावेळी मध्यप्रदेशात ही योजना यशस्वी झाली, त्यानंतर महाराष्ट्रात राबविली यावरून महिलांची साथ भाजपाला मिळाली हे पहिल्यांदा मान्य करावेच लागेल. यात शंका देखिल घेण्याचे कारण नाही. भाजपाने विकास केला तोही कामाला आला असेल. सर्वात महत्त्वाचे जनतेला प्रश्न निर्माण झाला असेत की, भाजपाला, महायुतीय मत द्यायचे नको तर कोणाला द्यायाचे? महाविकास आघाडीचा पक्का निर्णय घेत नाहीत, वास्तविक राज्यात सर्वात वाईट आवस्था काँग्रेसची झाली आहे. मोठा इतिहास काँग्रेसच्या पाठीशी असून काँग्रेसला चपराक मोठी आहे. लातूर जिल्हा हा काँग्रेसचा एकेकाळी बालेकिल्ला यात काँग्रेसची आवस्था काय झाली. एकही नगराध्यक्ष निवडला गेला नाही. सर्वाधिक कमी प्राथमिक अंदाजानुसार कमी नगरसेवक दिसून येतात. एक नंबरवर भाजपा, दुसरा एकनाथ शिंदे यांची शिवसेना तर तिसरी अजित पवार यांची राष्ट्रवादीस यश मिळाले आहे. सत्ताधारी तीन पक्ष व विरोधातील तीन पक्ष जसे उद्धव ठाकरे, शरद पवार यांची राष्ट्रवादी व काँग्रेसची बेरीज केली तर शंभराच्या आत दिसून येतात. हा फरक लक्षात घेता या तिन्ही पक्षास विचार करावयाला लावणार निकाल आहे. या नंतर महानगरपालिकेची निवडणुक होणार आहे. यानंतर जिल्हापरिषदची होईल. यात काँग्रेस, शरद पवार व उद्धव ठाकरे यांना कसे यश मिळेल? काँग्रेसचा ग्रामीण भागात कार्यकर्ते आहेत. उद्धव ठाकरे यांना अवघड जाणार आहे. आता तर उद्धव ठाकरे यांना मिळालेले अपयश पहाता मनसेचे राज ठाकरे निश्चित विचार करतील. ते उद्याचालून शिवसेना उद्धव ठाकरे सोबत जाताना विचार करतील. उद्धव ठाकरे यांनी एक पावले मागे घेऊन जर एकनाथ शिंदे यांची नाराजगी दूर केली असती व भाजपासोबतच राहीले असते तर आज ही वाईट स्थिती पाहावयास मिळाली नसती. जे झाले ते झाले. आता भाजपा मागे हटेल असे वाटत नाही. ते महायुतीचा विजय म्हणत असतील मात्र मोठा भाऊ भाजपालाच मानावे लागेल. एकनाथ शिंदे यांना सोबत घ्यावे लागेल. नाराज करून आता चालणार नाही. मुळात राज ठाकरे यांची भुमिका महत्वाची आहे. ते उद्धव ठाकरे सोबत मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत राहीले तर काय होईल याचा अंदाज घेतला पाहिजे. नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकीचा निकालावरून आगामी गणित सोडविता येते. त्यात भाजपाने म्हणा किंवा महायुतीने लाडक्या बहिन नाराज केल्या तर मोठे अपयश सत्ताधाऱ्यास येण्याची शक्यता आहे. आज देशात भाजपाला यश मिळत आहे हे महिलांच्या म्हणा किंवा लाडक्या बहीणीमुळे मिळत आहे हे विसरून चालणार नाही. देशात लाडक्या बहिणी सरस ठरत आहेत. कोणी काही मत व्यक्त करीत आहे. विकास केल्याची बाजी मारत असले तरी लाडक्या बहिणीस विसरून बघा काय घडते! या बाबत केवळ विचार करा? त्यामुळे काही झाले तरी भाजपा मोठा भाऊ आहे हे मान्यच केले पाहिजे. अल्पावधित भाजपाचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे सरस ठरत आहे. आता तर केंद्रात मोदीजी व शहा यांच्यापुढे मोठी ताकद दिसून येणार आहे. महाराष्ट्राचे वजन फडणवीस केंद्रात वाढणार आहे. मोठा भाऊ भाजपाच आहे लाडक्या बहिणीची साथीमुळे यश मिळाले आहे हे नक्की!

# भारतीय शेतकरी जीवनातील सामाजिक संकटांची हकीकत

२३ डिसेंबर हा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो, कारण शेतकरी हा आपल्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेचा पाया आहे व देशाच्या अन्नसुरक्षेपासून ते सांस्कृतिक गुरुत्वापर्यंत अशा अनेक पैलूंमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. परंतु ताज्या च्या २०२३ च्या ‘‘ ’’ या अहवालानुसार शेती व कृषीक्षेत्राशी संबधित हजारो लोकांनी आत्महत्या केल्याची घटना आपल्या सामाजिक-आर्थिक हिताच्या अंतर्गत गंभीर विचारण्यास भाग पाडते. या अहवालानुसार वर्षभरात १०,७८६ शेती क्षेत्राशी संबंधित लोकांनी आत्महत्या केली आहे जेथे ४,६९० शेतकरी आणि ६,०९६ शेती मजूर यांचा समावेश आहे, आणि हे आकडे देशातील एकूण १,७१,४१८ आत्महत्यांपैकी सुमारे ६.३% इतका भाग आहे, म्हणजे रोज सरासरी जवळपास २९ ते ३० शेतकरी किंवा शेती मजूर आपल्या जीवनाचा निरोप घेत आहेत, आणि या आकडेवारीतील सामाजिक अर्थाचा अंतर्भाव आपल्याला शेतकरी समुदायाच्या जीवनातील खोल सामाजिक समस्यांकडे समजूतदारपणे पाहण्यास भाग पाडतो. या अहवालातील आकडे लिंगानुसार विभागले असता लक्षात येते की शेतकरी व शेती मजूर समुदायातील आत्महत्यांमध्ये पुरुषांची संख्या जास्त दिसते. आकडेवारीनुसार ४,६९० शेतकऱ्यापैकी ४,५५३ पुरुष व १३७ महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तसेच ६,०९६ शेती मजूरांपैकी ५,४३३ पुरुष व ६६३ महिला शेती मजुरांनी आत्महत्या केली आहे, आणि या विभाजनातून आपण पाहू शकतो की शेतकरी समाजातील पुरुष आणि महिला दोघांवरही विविध स्वरूपांचे सामाजिक व आर्थिक तणाव परिणाम करीत आहेत. पुरुष शेतकऱ्यांवर सामाजिक प्रतिष्ठा, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी, पिकांचे उत्पन्न आणि घराचा भरणा यासारख्या मानसिक दबावाचे भार अधिक स्पष्टपणे दिसतो, तर महिला शेतकरी व मजुरांना त्यांच्या कुटुंबातील भूमिकांबरोबरच आर्थिक सहभाग आणि सामाजिक मनोवैज्ञानिक ताण यांचा तडाखा भोगावा लागतो, ज्यातून आत्महत्येच्या घटनांचा सामाजिक-मानसिक संदर्भ अधिक गुंतागुंतीचा बनतो.

राज्यवार आकडे पाहिले असता, आपले महाराष्ट्र हे राज्य अहवालानुसार सर्वाधिक आत्महत्यांच्या घटनांमध्ये अग्रस्थानावर आहे, जिथे सुमारे ३८.५% शेती क्षेत्राशी संबंधित आत्महत्यांचे प्रकरणे महाराष्ट्रातून नोंदली गेली आहेत, त्यानंतर कर्नाटक (२२.५%), आंध्र प्रदेश (८.६%), मध्य प्रदेश (७.२%) आणि तमिळनाडू (५.९%) अशा राज्यांमध्ये ही संख्या महत्त्वाची आहे, आणि या आकड्यांमधून हे स्पष्ट होते की कृषीप्रधान राज्यांमध्ये शेतकरी व शेती मजूर समुदायाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे, जे ग्रामीण जीवनातील परिस्थितीच्या विविध पैलूंशी जुळलेले आहेत. अहवालानुसार आत्महत्यांच्या या घटनांमध्ये वार्षिक उत्पन्न ₹१,००,०००पेक्षा कमी असलेल्या लोकांचा वाटा सुमारे ६६.२% इतका आहे, आणि या आकड्यामुळे आर्थिक असुरक्षा हा शेतकरी जीवनातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे स्पष्ट होते, कारण अनेक शेतकरी आपल्या उत्पन्नावर अवलंबून असतात आणि त्यांच्या वार्षिक उत्पन्नातील कमी पडलेले प्रमाण त्यांच्या कुटुंबीय खर्च, उत्पादन खर्च, कर्जाची परतफेड आणि सामाजिक आवश्यकतांसोबत सरेखित होत नाही, ज्यामुळे आर्थिक तणाव वाढतो आणि तो सामाजिक प्रतिष्ठा व मानसिक स्वास्थ्यावर खोल परिणाम करतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषित केल्यास शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ आर्थिक संकटापुरता मर्यादित नसून, तो सामाजिक संरचनेतील खोल समस्यांचे प्रतिबिंब आहे, कारण शेतकरी समुदायाच्या जीवनात सामाजिक प्रतिष्ठा, समुदायातील स्थान, कुटुंबीय जबाबदाऱ्या, कर्जाचा दबाव, बाजार भावातील अनिश्चितता, हवामानातील बदल, पिकांचे नुकसान व सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा अभाव हे सर्व घटक एकत्रितपणे त्यांच्या मानसिक अवस्थेवर हे गंभीर प्रभाव टाकतात. त्यामुळे हा विषय व्यक्तिगत वृत्तीचा प्रश्न नाही तर सामाजिक-आर्थिक संरचनात्मक अस्तित्वाचा प्रश्न आहे. सामाजिक प्रतिष्ठा हा भारतीय ग्रामीण क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे, ज्याचा प्रभाव शेतकऱ्याच्या सामाजिक जीवनावर, कुटुंबीय नात्यावर आणि समुदायातील स्थानावर दिसून येतो, आणि जेव्हा आर्थिक परिस्थिती व सामाजिक अपेक्षांमध्ये विसंगती निर्माण होते, तेव्हा तो मानसिक ताणात बदलतो. या ताणाचा परिणाम त्यांच्या निर्णय प्रक्रियेतून गंभीर निर्णयाकडे वळू शकतो, ज्यामध्ये आत्महत्याकडे वळण्याची शक्यता वाढते, कारण सामाजिक प्रतिष्ठा, घरातील आर्थिक स्थिती आणि सामाजिक अपेक्षांचा संयुक्त प्रभाव त्यांच्या चिंतनात प्रमुख भूमिका बजावतो. ग्रामीण समाजातील पारंपारिक सामाजिक संरचना, जिथे शेतकरी समुदाय सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये, परंपरा आणि सामाजिक सहयोग यावर आधारित असतो, आता बदलत्या आर्थिक युगात अधिक आव्हानात्मक बनत आहे, कारण आर्थिक दबावाने पारंपारिक सामाजिक समर्थन प्रणाली कमजोर होत आहे. शेतकरी कुटुंबातील पुरुष व महिला दोघांनाही विविध सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो आणि या अपेक्षांचे ताण त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम करतात. पुरुष शेतकरी, विशेषतः घरातील एक उत्पन्नकर्ता म्हणून, आर्थिक दबाव, कर्जाचे वाढते दडपण आणि कुटुंबीय अपेक्षा यांचा अत्यधिक ताण अनुभवतात, तर महिला शेतकरी व शेती मजूरांना कुटुंब, घरकाम आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचा तणाव जास्त जाणवतो. त्यामुळे दोन्ही लिंगांमध्ये मानसिक ताणाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी परिणाम हे सामाजिक आणि व्यक्तिगत दोन्ही स्तरावर खोलवर दिसतात.

श्रमाचे स्वरूप व शेतकरी आयुष्याचा नैसर्गिक अवलंबित्व यामुळे, हवामानातील बदल, पर्जन्याचे अनियमित स्वरूप, पिकांचे अपयश व उत्पादन खर्चातील वाढ हे सर्व शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक जोखीम वाढवतात. ज्या परिस्थितीत शेतकरी पावसावर विश्वास ठेवून पिके पेरतात आणि पावसाळ्यातील अनियमित पावसामुळे पिकांचे नुकसान होते, तेव्हा त्यांची आर्थिक स्थिती गंभीर संकटात येते. यासोबतच बाजारभाव कमी मिळाल्यास पिक उत्पादनाच्या खर्चाची भरपाईही होत नाही आणि त्यामुळे उत्पन्नात मोठी घट होते. अशा परिस्थितीत अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्यात अडकतात आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांना मानसिक दबाव आणि सामाजिक प्रतिष्ठेतील ताणाला सामोरे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्या जीवनात मानसिक सामाजिक असुरक्षा वाढते. हे सर्व घडताना सामाजिक समर्थन, समुदायाचा सहभाग, शेतकऱ्याना शाळा, शिक्षण व आरोग्य सुविधा यांचा अभाव ही समस्या आणखी जटिल करते.

शेतकरी आत्महत्यांचा तपशील पाहिल्यास लक्षात येते की केवळ कर्ज हे एकमेव कारण नसून असे अनेक सामाजिक आणि मनोवैज्ञानिक कारणे आहेत ज्यांचा परिणाम आत्महत्यांचे आकडे वाढवण्यात दिसतो. ग्रामीण समाजात आर्थिक संकट व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणामुळे, व्यक्ती मनोवैज्ञानिकदृष्ट्या निष्काळजीपणा आणि >> पान ५

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या डॉ.शंकर धनराज बिराजदार यांनी विकसित केले गेमचेंजर’ मायक्रोरिएक्टर उपकरण व हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स निर्मिती तंत्रज्ञान : मेक इन इंडियाला बळ!

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ.शंकर धनराज बिराजदार यांच्या संशोधन कार्याला भारत सरकारच्या भारतीय पेटंट कार्यालयाने अधिकृत मान्यता दिली आहे.या महत्त्वपूर्ण संशोधनाला अधिकृत मान्यता मिळाल्याने दयानंद शिक्षण संस्थेच्या व दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या आणि लातूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.त्यांच्या या संशोधन कार्याचे सर्वत्र अभिनंदन व संशोधनाचा गौरव होत आहे. त्यांच्या या ‘‘सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स निर्मितीसाठी सुधारित उपकरण व त्याची प्रक्रिया’’ या संशोधनाला मिळालेल्या या पेटंटमुळे देशातील ‘‘ आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया ’’ उपक्रमाला लक्षणीय चालना मिळणार आहे. डॉ.बिराजदार यांच्या या महत्त्वपूर्ण पेटंट प्राप्त संशोधन कार्यामध्ये एन.आय.टी.सुरत येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रा.डॉ.अतुल आर.सराफ आणि एस.एम.पी. महाविद्यालय,मुरूम येथील डॉ. रवींद्र सी.आळंगे,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,छत्रपती संभाजी नगर येथील युवराज एस.मुंढे यांचा उल्लेखनीय सहभाग आहे. तसेच एम.आय.टी. छत्रपती संभाजी नगर येथील डॉ.निलेश जी. पाटील,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावती येथील डॉ.कुशल वासणकर तसेच डॉ.अनुजा सदावर्ते,ऋषिकेश चव्हाण,मंगेश जामकर या संशोधकांचाही महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

**नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि पेटंटचे महत्त्व :** डॉ.शंकर बिराजदार व त्यांचे संशोधक सहकारी यांनी विकसित केलेले अल्टरनेटिंग मॅग्नेटिक फील्ड-सहाय्यित सतत-प्रवाह मायक्रोरिएक्टर हे एक नावीन्यपूर्ण उपकरण आहे.हे उपकरण नियंत्रित पद्धतीने, उच्च-गुणवत्तेचे फेराइट-आधारित सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स तयार करते. या तंत्रज्ञानामुळे आता औद्योगिक स्तरावर मोठ्या प्रमाणात, सातत्यपूर्ण आणि उच्च दर्जाचे मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स पदार्थ उत्पादन करणे शक्य झाले आहे.स्थायी चुंबकीय नॅनोकण पदार्थ (सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) हे ट्रान्सफॉर्मर कोअर्स, इंडक्टर्स, उच्च-वारंवारता, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, रडार प्रणाली उपकरणे, लाऊडस्पीकर्स, डी.सी. मोटर्स आणि इलेक्ट्रिक मोटर्स यासारख्या अनेक महत्त्वाच्या उद्योगांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. पारंपरिक बॅच रिॲक्टर प्रणालीमध्ये स्थायी चुंबकीय नॅनोकणांच्या निर्मितीदरम्यान त्यांचे समुच्चयन (ॲग्लोमरेशन) होते आणि यामुळे उष्णतेच्या वहनात (हिट ट्रान्स्फर) असमानता निर्माण होते.यामुळे स्थायी चुंबकीय नॅनोकणांचे गुणधर्म अस्थिर होतात आणि अंतिम उत्पादनाची चुंबकीय शक्ती कमी होते. या पारंपरिक पद्धतीत चुंबकीय नॅनोकणांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केल्यास त्यांच्या गुणवत्तेत घट होते आणि कणांमधील एकसमानता राखणे कठीण जाते.मात्र, हे पेटंटप्राप्त तंत्रज्ञान चुंबकीय नॅनोकण पदार्थाचे (सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतानाही गुणधर्म व गुणवत्ता सातत्यपूर्ण आणि एकसमान राखते. हे चुंबकीय क्षेत्र संश्लेषण प्रक्रियेदरम्यान चुंबकीय क्षेत्राची दिशा व तीव्रता कालांतराने बदलते, ज्यामुळे आण्विक स्तरावर कणांच्या सरेखन (अलायनमेंट) व संरचनेवर अत्यंत सूक्ष्म नियंत्रण साधले जाते. कणांची परस्परांना चिकटण्याची समुच्चयन (ॲग्लोमेरेट होण्याची) प्रवृत्ती कमी होते. परिणामी, उत्कृष्ट चुंबकीय गुणधर्म असलेले उच्च दर्जाचे चुंबकीय नॅनोकण तयार करता येतात. विशेषतः, या पेटंटमुळे फेराइट-आधारित (सॉफ्ट आणि हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) स्थायी चुंबकीय नॅनोकणांचे उच्च-गुणवत्तेचे, सातत्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन औद्योगिक स्तरावर प्रभावीपणे करणे आता शक्य होणार आहे. हे पेटंट प्राप्त झालेले तंत्रज्ञान वापरून स्थायी चुंबकीय नॅनोकण तयार करण्यासाठी खूप कमी वेळ लागतो. पारंपरिक पद्धतींमध्ये लागणारे अतिरिक्त घटक आणि उप-उपकरणे टाळता येतात, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. प्रक्रिया सुलभ आणि पर्यावरणास अधिक अनुकूल होते.

**पेटंटचे औद्योगिक महत्त्व आणि आत्मनिर्भर भारत उपक्रमाला लक्षणीय चालना**

हे तंत्रज्ञान अनेक उद्योगांसाठी गेमचेंजर ठरू शकते. भारत सरकारने ₹७,२८० कोटींची एक महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली असून,तिचा उद्देश दुर्मिळ पृथ्वी स्थायी चुंबक (रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस ) यांच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे हा आहे. इलेक्ट्रिक वाहने,संरक्षण क्षेत्र आणि नवीकरणीय ऊर्जा यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या या चुंबकांसाठी स्वावलंबी व मजबूत उत्पादन परिसंस्था उभारणे आणि विशेषतः चीनवरील आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये मंजूर झालेल्या या सात वर्षांच्या योजनेअंतर्गत, दरवर्षी ६,००० मेट्रिक टन क्षमतेचे रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस (जसे की निओडीमियम-लोह-बोरॉन - चुंबक) तयार करण्यासाठी उच्च-गुणवत्तेच्या, सातत्यपूर्ण आणि एकसमान चुंबकीय पदार्थांची आवश्यकता असते. डॉ. बिराजदार यांचे तंत्रज्ञान नेमकी हीच गरज पूर्ण करते.

या पेटंटमुळे दुर्मिळ पृथ्वी स्थायी चुंबकांना (रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस) सक्षम पर्याय ठरू शकणाऱ्या फेराइट-आधारित (हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) स्थायी चुंबकीय नॅनोकणांचे उच्च-गुणवत्तेचे, सातत्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे शक्य होणार आहे. फेराइट्सचा उपयोग अनेक उच्च-फ्रिक्वेंसी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ट्रान्सफॉर्मर कोअर्स आणि मोटर्समध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो, जे रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटसच्या उत्पादन साखळीतील महत्त्वाचे घटक आहेत. देशात फेराइट-आधारित स्थायी चुंबकीय नॅनोकण (हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स) पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य झाल्यामुळे,रेअर अर्थ पर्मनंट मॅग्नेटस यामुळे, (उत्पादनासाठी) लागणाऱ्या कच्च्या मालाच्या आयातीवरील अवलंबित्व लक्षणीयरित्या कमी होईल, परिणामी भारत सरकारच्या ‘‘आत्मनिर्भर भारत’’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला लक्षणीय गती मिळेल.

डॉ.बिराजदार आणि त्यांच्या संशोधक चमूने केलेल्या या महत्त्वपूर्ण शोधामुळे देशातील नॅनो-तंत्रज्ञान आणि फेराइट-आधारित हार्ड मॅग्नेटिक नॅनोमटेरिअल्स पदार्थ औद्योगिक उत्पादन क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे.या चुंबकीय नॅनोकणांच्या उच्च गुणवत्तेमुळे, आधुनिक उद्योगांची मूलभूत गरज असलेली सातत्यपूर्ण उत्कृष्टता हे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर साध्य करते, परिणामी देशाच्या औद्योगिक प्रगतीला निश्चितच बळ मिळणार आहे.डॉ. बिराजदार आणि त्यांच्या संशोधक चमूने केलेल्या विविध महत्त्वपूर्ण संशोधनांसाठी यापूर्वी त्यांना भारतीय पेटंट कार्यालयाकडून सहा (०६) पेटंट्सची अधिकृत मान्यता मिळाली आहे.संशोधन क्षेत्रात त्यांचे योगदान केवळ देशांतर्गत नाही, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही महत्त्वपूर्ण ठरले आहे.डॉ. शंकर बिराजदार यांचे नामांकित आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण ४५ शोधनिबंध प्रकाशित असून, त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये आपल्या शोधनिबंधांचे प्रभावीपणे वाचन केले आहे.त्यांच्या संशोधन क्षेत्रातील या अद्वितीय कार्याबद्दल आणि भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी,सचिव रमेशजी बियाणी,संयुक्त सचिव विशाल लाहोटी,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड आणि महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,इतर प्राध्यापक,शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# वय फक्त आकडा नाही हो! सुखी संसारासाठी वय महत्त्वाचे, लग्न करताना एवढे अंतर तर हवेच; चाणक्याने सांगितलेय कारण

चाणक्य नीतिचा वापर आजही अनेकजण करतात. वैयक्तिक आयुष्यात यश मिळवण्यासाठी या चाणक्य नीतिला अवलंब अनेकजण करतात. लग्न कोणतेही असू दे अरेंज की लव्ह पण सगळ्यात कॉमन विचारला जाणरा प्रश्न म्हणजे दोघांच्या वयात किती अंतर आहे घरातील ज्येष्ठ मंडळी कायम सांगतात की मुलगी ही मुलापेक्षा लहान असावी. आपण अशा गोष्टी नेहमी ऐकत आलेलो आहोत.नव्या पिढीतील मुले तर एज जस्ट नंबर म्हणून या प्रश्न टाळतात. पण तुम्हाला माहित आहे का, आचार्य चाणक्य सांगतात तुम्हाला वैवाहिक जीवनात आनंद हवा असेल तर या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे. विशेषत: लग्न करताना वयाम



धील अंतराकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, चला तर आज जाणून घेऊया सुखी संसारासाठी आचार्य चाणक्यांनी काय सांगितले आहे.

**विवाह हा एक आध्यात्मिक अनुभव**

सुखी संसारासाठी आचार्य चाणक्यांनी अनेक गोष्टी सांगितल्या आहे. आचार्य चाणक्य म्हणतात, लग्न हे एक आदर्श सामाजिक-धार्मिक नाते आहे. विवाह हा एक आध्यात्मिक अनुभव आहे. आचार्य चाणक्य म्हणतात की, यशस्वी विवाह म्हणजे ज्यामध्ये पती-पत्नी एकमेकांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या संतुष्ट करतात.

**पती-पत्नीमध्ये जास्त अंतर नसावे...**

आचार्य चाणक्य यांनी म्हटले आहे की, लग्न करताना हे लक्षात ठेवले पाहिजे की पती-पत्नीच्या वयात जास्त अंतर नसावे. शारीरिकदृष्ट्या सक्षम पुरुषच आपल्या पत्नीच्या आकांक्षा पूर्ण करू शकतो. अशा परिस्थितीत पती आणि पत्नीमध्ये जर जास्त अंतर असेल तर तो पत्नीला मानसिक आणि शारीरिक सुख देऊ शकत नाही. आचार्य चाणक्य यांनी म्हटले आहे की जर पत्नीची इच्छा पूर्ण झाली नाही तर ती दुसऱ्या पुरुषाकडे आकर्षित होऊ शकते आणि त्यामुळे वैवाहिक जीवन उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे.

आचार्य चाणक्य यांनी वैवाहिक नातेसंबंधांवर देखील भाष्य केलं आहे. असं म्हणतात की, नवरा बायकोचं नातं हे फक्त एका जन्मासाठीच नाही तर पुढच्या सातही जन्मासाठी बांधलं गेलं आहे. पती-पत्नी म्हणजे एका रथाची दोन चाकं आहेत.

# मुलांना रात्री झोपताना घाम का येतो उपाय आणि कारणे समजून घ्या



रात्री घाम येण्याची अनेक कारणे आहेत. यामध्ये उष्ण हवामानात झोपणे आणि जास्त कपडे घालणे, तसेच चिंता आणि कर्करोगासारखी गंभीर कारणे यांचा समावेश होतो. रात्रीचा घाम येणे कोणत्याही वयोगटातील लोकांना होऊ शकते. या समस्येचा मुलांवर खूप परिणाम होतो. जेव्हा मुलांना घाम येतो तेव्हा पालक त्याकडे दुर्लक्ष करतात. पण असे दुर्लक्ष करणे शरीरासाठी घातक असते. लहान मुलांमध्ये घाम येण्यामागील कारणे आणि ते कमी करण्यासाठीचे उपाय सांगणार आहोत.

**मुलांना रात्री घाम येण्याची कारणे**

रात्रीचा घाम येणे सामान्यत: सामान्य असते. उष्ण तापमान किंवा खूप उबदार असलेल्या बेडिंगचा वापर केल्याने मुलांना रात्री खूप घाम येऊ शकतो. जर तुमच्या मुलांना खूप घाम येत असेल तर त्यामागे अनेक गंभीर कारणे असू शकतात. याविषयी जाणून घेऊया-

**भीती किंवा चिंता**

काही मुले खूप घाबरलेली किंवा घाबरलेली असतात. अशा मुलांना खूप घाम येतो. काही अहवाल असे सूचित करतात की, जर मुलांना कोणत्याही प्रकारची भीती वाटत असेल तर त्यांना रात्री खूप घाम येऊ शकतो.

**हायपरहाइड्रोसिस**

हायपरहाइड्रोसिस असलेल्या मुलांना कोणत्याही उघड कारणाशिवाय विलक्षण घाम येतो. हायपरहाइड्रोसिसने ग्रस्त असलेल्या मुलांना दिवसा किंवा रात्री कधीही घाम येऊ शकतो. जरी, ही एक गंभीर स्थिती नाही, परंतु कधीकधी यामुळे लाजिरवाणे होते.

**हायपोग्लाइसेमिया**

जेव्हा रक्तातील ग्लुकोजची पातळी ७० मिलीग्राम प्रति डेसीलिटर (ास/वड) च्या खाली येते तेव्हा हायपोग्लायसेमिया होतो. या स्थितीमुळे ग्रस्त असलेल्या मुलांना रात्री खूप घाम येऊ शकतो.

**रात्री घाम येणे कसे टाळावे**

मुलांमध्ये रात्रीचा घाम येण्यापासून थांबवण्याचा असा कोणताही उपाय नाही. , कारण काही अंतर्गत परिस्थितींमुळे घाम येतो. पालक आणि काळजीवाहू खालील उपाय करून रात्रीचा घाम टाळण्यासाठी मदत क शकतात:

**बाळाची खोली थंड असल्याची खात्री करा.**

झोपलेल्या बाळांवर खूप थर किंवा ब्लँकेट घालू नका.

झोपण्यापूर्वी जास्त शारीरिक हालचाली टाळणे इ.



# अशांत बांगला देश

शरीफ हादीच्या हत्येने बांगला देशात भारत द्वेष बळावू लागला आहे. त्याचा फायदा पाकिस्तानातील दहशतवादी संघटना घेण्याची शक्यताही वाढली आहे. त्यामुळे पूर्व सीमेवर भारताच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यताही वाढली आहे.



बांगलादेशात पुन्हा एकदा हिंसाचार उसळला आहे. माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा विरोधक आणि तेथील विद्यार्थी चळवळीचा नेता शरीफ उस्मान हादी याची हत्या हे या वेळच्या हिंसाचाराचे निमित्त ठरले आहे. हिंसाचार केवळ राजधानी ढाका शहरापुरता मर्यादित नाही, बांगला देशाच्या अन्य भागांतही त्याचे लोण पसरले आहे. मायमेनसिंग गावात दिपु चंद्र दास नामक युवकाची हिंसक जमावाने ठेचून हत्या केली आणि नंतर त्याचा मृतदेह पेटवून दिला. देशातील दोन बड्या वृत्तपत्रांच्या कार्यालयांना आग लावण्याची घटनाही धक्कादायक आहे.

हादीच्या समर्थकांनी भारतीय उच्चायुक्त कार्यालयास लक्ष्य केले ही भारतासाठी चिंतेची बाब आहे. येत्या फेब्रुवारीमध्ये बांगला देशात सार्वत्रिक निवडणूक होत आहे. आता उसळलेल्या हिंसाचाराने ती निवडणूकच धोक्यात येऊ शकते. तेथील हंगामी सरकारने शांततेचे आवाहन केले असले तरी त्याचा कितपत उपयोग होईल याची शंका आहे. महमद युनुस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारला देशात शांतता हवी आहे का? यावरही संशय घेण्याजोगी स्थिती आहे. शेख हसीना यांना पदच्युत करणार्या गटांबद्दल युनुस यांना सहानुभूती असल्याचे पूर्वीही दिसले आहे. बांगला देशातील नियोजित निवडणूक मुक्त व न्याय्य वातावरणात पार पडतील की नाही अशी भीती आता व्यक्त होत आहे.

भारत विरोधी सूर

गेल्या वर्षी बांगला देशात झालेल्या युवकांच्या आंदोलनात शरीफ उस्मान हादी अग्रभागी होता. शेख हसीना यांच्या सरकारला जनता विरोधी ठरवताना त्याने भारतासही लक्ष्य केले होते. हसीना यांचे सरकार भ्रष्ट आहे व त्यास भारताचा पाठिंबा आणि मदत होत आहे, असा आरोपांचा रोख होता. आगामी निवडणूक हादी लढवणार होता. गेल्या आठवड्यात ढाक्यात त्याच्यावर गोळीबार झाला. त्याला सरकारने सिंगापूरला उपचारासाठी हलवले होते; पण तेथे त्याचा मृत्यु झाला. त्यामुळे त्याचे समर्थक संतापले. हादीचे मारेकरी भारतात पळून गेल्याचे तेथे सांगितले जात आहे, त्यास कोणताही पुरावा दिला गेलेला नाही; मात्र या आरोपामुळे ताज्या हिंसाचाराला भारतविरोधी स्वरूप आले. हादीच्या मृत्यूच्या वृत्तास दुजोरा देताना युनुस यांनी दूर चित्रवाणीवरून केलेल्या भाषणात त्याच्या मारेकर्यांना दया दाखवली जाणार नाही असे म्हटले. हादी व त्याच्या समर्थकांना त्यांनी 'क्रांतिकारक' म्हटले आहे. 'पराभूत शक्ती व फॅसिस्ट दहशतवाद्यांचा शत्रू' असे युनुस यांनी हादीचे वर्णन केले. त्यांचा रोख हसीना व त्यांचा अवामी लीग हा पक्ष यांच्याकडे आहे हे स्पष्ट आहे. गेल्या वर्षी हादी व आंदोलक युवकांनी अवामी लीग मोडीत काढण्याची मागणी केली होती. आगामी निवडणुकीत भाग घेण्यास युनुस यांनी अवामी लीगला बंदी घातल्याचे अलीकडेच जाहीर केले होते. युनुस यांची हादी व आंदोलक युवकांना सहनुभूती आहे हे त्यावरून दिसते. शेख हसीना यांचे चिरंजीव साजीब वाझेब जॉय यांची एक मुलाखत नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. निवडणुकीत गैरव्यवहार करून युनुस इस्लामवाद्यांना सत्तेत आणू पाहात आहेत, असा उघड आरोप त्यांनी केला आहे. बांगला देशात दहशतवाद्यांची प्रशिक्षण केंद्रे स्थापन झाली आहेत, अल् कायदा या संघटनेचे हस्तक आणि लष्कर ए तोयबाचे काही म्होरके यांची जाहीर भाषणेही तेथे झाली आहेत, असा दावा करून साजीब यांनी भारतास असलेला धोका खरा आहे असा इशारा दिला आहे. ढाक्यातील उच्चायुक्त कार्यालय व इतरत्र असलेली उप उच्चायुक्तांची कार्यालये यांना आंदोलकांनी लक्ष्य केले आहे. हे बघता साजीब यांच्या दाव्यात तथ्य असू शकते. तेथील आगामी निवडणूक 'सर्व समावेशक' असावी आणि ती शांततेत पार पडावी अशी अपेक्षा भारताने व्यक्त केली आहे. 'सर्व समावेशक' याचा अर्थ अवामी लीगला त्यात भाग घेता यावा. निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याच्या दुसर्या दिवशी हादीची हत्या झाली, आता तेथे हिंसाचार माजला आहे. या स्थितीत निवडणुका लांबणीवर पडतील का? याची भारतास चिंता आहे. अशांत शेजार हा सुरक्षा व आर्थिक हितसंबंधांसाठी धोका नक्कीच आहे.

# हिवाळ्यात रोग प्रतिकारक शक्ती वाढवणारे या पदार्थाचे सेवन करा

हिवाळ्यात आपण अनेकदा आजारी पडतो, जे आपल्या कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे असू शकते. अशा परिस्थितीत, आपल्या आहारात या पदार्थांचा समावेश करणे तुमच्या शरीरासाठी फायदेशीर ठरू शकते.

-ङडज ठए-ऊ हिवाळ्यात ब्रोकोली खाणे अत्यंत फायदेशीर आहे आरोग्य फायदे जाणून घ्या



हिवाळ्याच्या आगमनाने विविध विषाणूजन्य आजारांचा प्रसार होतो. या ऋतूत शरीर उबदार ठेवणे आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणे हे एक मोठे आव्हान बनते. तथापि, योग्य आहार योजनेने, रोगप्रतिकारक शक्ती वाढवता येते आणि शरीर उबदार ठेवता येते. तुम्हाला निरोगी आणि उत्साही ठेवण्यासाठी हिवाळ्यातील काही सोप्या आणि नैसर्गिक आहाराच्या सूचना येथे आहेत. थंडीच्या काळात आल्याचे सेवन विशेषतः फायदेशीर आहे. आल्यामुळे शरीर उबदार होते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. आल्याचे सेवन चहामध्ये करता येते, भाज्यांमध्ये मिसळता येते किंवा काढा म्हणून सेवन करता येते. दररोज थोडेसे आले खाल्ल्याने सर्दी आणि संसर्ग टाळता येतो.

-ङडज ठए-ऊ हिवाळ्यात पालक खाण्याचे आरोग्यदायी फायदे

गुळाचे सेवन-हिवाळ्यात गूळ हा नैसर्गिक ऊर्जेचा स्रोत म्हणून काम करतो. तो शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करतो आणि थंडीपासून प्रतिकारशक्ती वाढवतो. तुम्ही गोड पदार्थांमध्ये साखरेऐवजी गूळ वापरू शकता, जे खूप फायदेशीर मानले जाते. याव्यतिरिक्त, तुम्ही गूळ चहा, गूळ ब्रेड आणि गूळ लाडू बनवू शकता, जे आपल्यासाठी सुपरफूड मानले जातात.

सुका मेवा

जर तुम्हाला थंडीपासून वाचायचे असेल तर तुमच्या आहारात सुकामेवा नक्की समाविष्ट करा. बदाम, काजू, अक्रोड, अंजीर आणि मनुका शरीराला आतून उबदार ठेवतात. त्यात असलेले निरोगी चरबी आणि पोषक घटक थंडीचा परिणाम कमी करण्यास मदत करतात. दररोज मूठभर सुकामेवा खाल्ल्याने शरीर मजबूत होते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते .

-ङडज ठए-ऊ दररोज सकाळी उठल्याबरोबर हे करा, वजन नियंत्रित होईल

तूप

तूप खाणे देखील फायदेशीर आहे. तूप शरीराला आवश्यक पोषण प्रदान करते आणि सांधे निरोगी ठेवते, हिवाळ्यात कडकपणा आणि वेदना कमी करते. तुमच्या जेवणात थोडे तूप घाला किंवा रोटीवर पसरवा. यामुळे पचन देखील सुधारते. गूळ आणि तूप एकत्र सेवन केले जाऊ शकते; ते अत्यंत फायदेशीर आहे.

शिवाय, तीळ आणि अळशीचे बियाणे हिवाळ्यात खूप फायदेशीर असतात. त्यामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि शरीराला उबदार ठेवणारे इतर पोषक घटक भरपूर असतात. तीळ लाडू, तीळ चिक्की म्हणून किंवा सॅलडमध्ये मिसळून खाऊ शकतात. हे संपूर्ण धान्य अनेक आजारांपासून बचाव करण्यास देखील मदत करते.

# ध्यान म्हणजे काय, ते कसे सुरू करावे?

ध्यानाने ताण कमी करा: आजच्या धावपळीच्या जीवनात, ताणतणाव, चिंता आणि मानसिक थकवा सामान्य झाला आहे. अशा वेळी, २१ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक ध्यान दिन आपल्याला थांबण्याची, चिंतन करण्याची आणि स्वतः मध्ये शांती शोधण्याची संधी देतो. ध्यान ही केवळ एक आध्यात्मिक साधना नाही तर निरोगी आणि संतुलित जीवन जगण्यासाठी एक प्रभावी कला आहे. हा दिवस आपल्याला जीवनाच्या धावपळीतून विराम देण्याची, स्वतःमध्ये डोकावण्याची आणि ध्यानाचे महत्त्व समजून घेण्याची संधी देतो.

ध्यान म्हणजे काय?



ध्यान म्हणजे सध्याच्या क्षणी मनाला स्थिर करण्याची प्रक्रिया. ते विचारांच्या गोंधळातून मुक्त होण्यास मदत करते आणि आत्म-जागरूकता आणि शांती मिळवते. नियमित ध्यान मन, शरीर आणि आत्म्यामध्ये संतुलन निर्माण करते.

ध्यान ही एक प्राचीन आणि शक्तिशाली पद्धत आहे जी आपल्याला या आव्हानाला तोंड देण्यास मदत करते. ध्यान हा जादूचा उपाय नाही तर तो एक मानसिक व्यायामशाळा आहे. नियमित सरावाने, तुम्ही तुमचे मन बळकट आणि शांत करायला शिकू शकता.

ध्यान कसे सुरू करावे?

* दररोज ५-१० मिनिटे शांत ठिकाणी बसा.
* डोळे बंद करा आणि खोल श्वास घ्या.
* मंत्र जप, श्वासोच्छवास ध्यान किंवा मूक ध्यान करा.
* नियमितता राखा, ही यशाची गुरुकिल्ली आहे.

जागतिक ध्यान दिनाचे महत्त्व: ध्यान केल्याने ताण, चिंता आणि नकारात्मक विचार कमी होतात, मानसिक शांती वाढते. ते अभ्यास, काम आणि निर्णय घेण्याची क्षमता सुधारते. ते एकाग्रता वाढवते. ते रक्तदाब नियंत्रित करते, झोप सुधारते, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि असंख्य आरोग्य फायदे प्रदान करते. ते भावनिक संतुलन सुधारते, राग, चिंता आणि नैराश्य कमी करते. ते आपल्याला स्वतःला समजून घेण्यास आणि आत्म-जागरूकता किंवा आंतरिक शक्ती ओळखण्यास मदत करते. जागतिक ध्यान दिन आपल्याला आठवण करून देतो की खरी शांती आपल्या आत आहे, बाहेर नाही. म्हणून, जागतिक ध्यान दिनी, दररोज काही वेळ ध्यानासाठी समर्पित करण्याचा संकल्प करा. हे छोटेसे पाऊल तुमच्या जीवनात लक्षणीय सकारात्मक बदल घडवून आणू शकते. जागतिक ध्यान दिनानिमित्त, आपण आपल्या दैनंदिन दिनचर्येत ध्यानाचा समावेश करण्याचा, आपले जीवन सोपे करण्याचा आणि आपल्या मनाला शांती देण्याचा संकल्प करूया. हा या दिवसाचा मुख्य संदेश आहे.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



कीवी हे एक छोटेसे फळ आहे जे पुर्णपणे व्हिटामीन सी ने भरलेले आहे.

जवळजवळ १२०% व्हिटामीन सी कीवी मध्ये आढळतं. किवी तुमच्या त्वचेला मुलायम ठेवण्यात साहाय्यक आहे. अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रीशन मध्ये प्रकाशीत झालेल्या अभ्यासानुसार ज्या आहारात व्हिटामीन सी भरपुर प्रमाणात असतं त्याचे सेवन केल्याने चेहे-यावरील सुरकुत्या आणि मुरूमांसारखे प्रकार दुर होतात.

(क्रमश. )

## विनोद




सौरव - माझी गाय सुका चारा खात नाही. फक्त हिरवा चारा खाते. पण हिरवा चारा आज मिळत नाही, मी काय करू?

सचिन - गाईच्या डोळ्याला हिरव्या रंगाचा चष्मा लावून टाक म्हणजे गाईला सुका चारा हिरवा दिसेल व ती खाईल.

## संदेश

Santa Banta eating Fish

Santa: oye banta machli khayega?

Banta: nhi yaar usme kaante hote hain.

Santa: oye chadd yaar, chap-pal pahen ke kha lena.

## सुविचार

शिक्षणाची मुळे कडू असली तरी त्याची फळे मधूर असतात.
- ॲरिस्टॉटल



### संस्कृत सुभाषित

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परांगतिम्॥

जो शास्त्राचे नियम झुगारून देऊन विषयोपभोगांच्या इच्छेप्रमाणे वर्तन करतो, तो सदैव अपयशी होतो, दुःखी होतो व त्याला श्रेष्ठ गती प्राप्त होत नाही.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. फायदा-तोटा
५. व्यावयाम
८. युद्ध
११. रस्ता, मार्ग
१२. रूक्ष, कोरडे
१३. कारण नसताना
१४. कारस्थान
१६. नीच, दृष्ट
१८. कपोल
२१. रवाळ, कणी असलेले
२३. शरीर
२५. सारखा
२६. पराभव, ऱ्हास
२७. फुरसत
२९अ. सोलापूरचा प्रसिद्ध चटकदार पदार्थ
३०. एक चतुर्थांश
३१. गणपतीचे एक नाव
३३. पोवळे
३४. रसपूर्ण
३६. घाण
३७. नरसंहार
३८. रजतपटावरील अजरामर सौंदर्यसम्राज्ञी
४०. कणीदार
४२. उत्सव
४३. रूंद (बांधा)
४५. पांढराशुभ्र लुसलुशीत प्राणी
४७. डावा
४८. आघाताचे आयुध
४९. भारताचे पहिले पंतप्रधान
५३. एकरुप
५५. जरच्या मागेमागे येणारा अटीचा शब्द
५६. नटवा, सजावट करा
५७. बंदी, मज्जाव
५८. एक श्वासरोग
६०. नोकरी नसलेला निरूपयोगी?
६२. टक, दृष्टी
६५. कहाणी
६६. कळपातील प्रमुख हत्ती
६७. जास्वंद
६९. लोणी
७१. सीतापती
७२. दाट, ढग
७३. आचारी
७६. शूर पुरुष
७९. शिकार
८०. खोदकाम
८१. गवताचे रुंद पान
८२. एकाक्षरी प्रश्न
८३. मला
८४. प्रत्येक दिवशी
८५. मीठ, लवण
८६. चप्पल

## उभे शब्द

१. नूतन
२. मोठा दरवाजा
३. अचानक झालेला बदल
४. श्रेष्ठ पुरुष
५. लाकूड कापण्याचे हत्यार
६. मैत्रीण
७. रत्न
८. हेतू धरून केलेले कार्य
९. करपलेला, जळलेला भाग
१०. तोफगाडी
१३. नीच, दुष्ट
१५. धरणे
१७. गुजराथी नृत्यप्रकार
१९. चटकन, त्वरित
२०. गावाची हद्द
२२. सेवक
२४.'-- उतरू आलं, अंग झिम्माड झालं.'
२६. पवित्र
२८. घालविणे, गाळणे, सोडणे
२९. फुरसत
३०. बासरी
३२. नगर, मोठे गाव
३३. अत्यंत हुशार, विद्वान
३५. नमस्काराचा एक शब्द
३६. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३८. शंभर किलो
३९. खाज
४१. दावा लावणारा, वैरी
४२. कमळ, मुलीचे एक नाव
४३. --- सामने, समोरासमोर
४४. गायीचे बछडे
४५. उद्देशावाचून
४६. उंट हाकणारा
४७. एक द्विदल धान्य
४८. येरझारा, जाणे-येणे
५०. निष्णांत
५१. दिवस
५२. विरोध, प्रतिबंध
५३. सारखा
५४. अंगरखा
५९. घरातील मधली खोली
६१. फणसाच्या एक प्रकार
६३. लोकांच्या मनातील विचार
६४. आवाज, गोगाट
६८. कर्ण
७०. पाणी
७३. घशाला त्रास देणारा अळू
७४. शर्करा
७५. मागाहून, मग
७७. दारूचा एक प्रकार
७८. विद्युत
७९. शृंगार, कोल्हापुरी दागिना
८१. कालवा, लग्न

## आडवे उत्तर

१.नफा नुकसान ५.कसरत ८.समर ११.वाट १२.रखरखीत १३.अकारण १४.कपट १६.नराधम १८.गाल २१.कणीदार २३.तन २५.सम २६.पाडाव २७.सवड २९अ.भडंग ३०.पाव ३१.गणेश ३३.प्रवाळ ३४.रसवान ३६.मळ ३७.हत्याकांड ३८.मधुबाला ४०.दाणेदार ४२.सण ४३.आडवा ४५.ससा ४७.वाम ४८.गदा ४९.पंडित जवाहरलाल नेहरू ५३.समरस ५५.तर ५६.सजवा ५७.मना ५८.दमा ६०.बेकार ६२.नजर ७१.सावज ८०.खनन ८१.पात ८२.का ८३.मज ८४.रोज ८५.रामरस ८६.खेटर

## उभे उत्तर

१.नवा २.फाटक ३.कलाटणी ४.नरवर ५.करवत ६.सखी ७.रतन ८.सकाम ९.मर १०.रणगाडा १३.अधम १५.पकडणे १७.रासगरबा १९.लवकर २०.वेस २२.दास २४.नभ २६.पावन २८.वगळणे २९.सवड ३०.पावा ३२.शहर ३३.प्रकांड पंडित ३५.सलाम ३६.मदार ३८.मण ३९.कंड ४१.दावेदार ४२.सरोज ४३.आमने ४४.वासरू ४५.सहज ४६.सारवान ४७.वाल ४८.गमनागमन ५०.तरबेज ५१.वासर ५२.हरकत ५३.सम ५४.सदरा ५९.माजघर ६१.कापा ६३.जनमानस ६४.रव ६८.कान ७०.नीर ७३.खाजरा ७४.साखर ७५.नंतर ७७.रम ७८.वीज ७९.साज ८१.पाट



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारतीय क्रिकेटपटूंना परदेशी लीगमध्ये जायला परवानगी, बीसीसीआय ची आयपीएल च्या एकाच टीमला परमिशन!

मुंबई-भारतीय क्रिकेटपटूंना अजूनपर्यंत परदेशातल्या टी-२० लीगमध्ये खेळण्याची परवानगी बीसीसीआयकडून देण्यात आलेली नाही, पण २०२६ मध्ये बीसीसीआय या नियमांमध्ये थोडा बदल करणार आहे. आयपीएलच्या फक्त एकाच टीमला त्यांच्या खेळाडूंना परदेशातल्या टी-२० लीगमध्ये घेऊन जायची परवानगी मिळाली आहे. लखनऊ सुपर जाएंट्सने त्यांच्या खेळाडूंना परदेशी लीगमध्ये घेऊन जाण्याची परवानगी बीसीसीआयकडून घेतली आहे. लखनऊची टीम त्यांच्या काही भारतीय खेळाडूंना प्रशिक्षणासाठी परदेशी लीगमध्ये पाठवत आहे. लखनऊ त्यांचे फास्ट बॉलर आवेश खान आणि मोहसीन खान यांना दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये पाठवण्याची तयारी करत आहे. लखनऊचे फास्ट बॉलर एसए२० लीग दरम्यान एलएसजी डर्बन सुपरजायंट्सच्या खेळाडूंसोबत प्रशिक्षण घेतील.एसए २० लीग २६ डिसेंबरपासून सुरू होत आहे. लीगमध्ये, आवेश आणि मोहसीन खान डर्बन सुपरजायंट्स प्रशिक्षकांच्या देखरेखीखाली त्यांचे कौशल्य वाढवतील, कारण त्यांच्यापैकी कोणीही सध्या बीसी-सीआय किंवा त्यांच्या राज्य संघांशी करारबद्ध नाही. असे असूनही, कोणत्याही नियमांचे उल्लंघन टाळण्यासाठी फ्रँचायझीने बीसीसीआयकडून आधीच पूर्व परवानगी घेतली आहे. बीसीसीआयनेही याला मान्यता दिली आहे. आवेश आणि मोहसीन व्यतिरिक्त, नमन तिवारीला देखील दक्षिण आफ्रिकेत पाठवले जाऊ शकते.

### कीवी गोलंदाजांसमोर कॅरोबियन फलंदाजांचे लोटांगण; न्यूझीलंडचा ३२३ धावांनी मोठा विजय

माउंट मौंगानुई २२ डिसेंबर -येथील बे ओव्हल इथं खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात न्यूझीलंड क्रिकेट संघानं वेस्ट इंडिजचा ३२३ धावांनी मोठा पराभव केला. या विजयासह, कीवी संघानं तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० असा विजय मिळवला. तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत वेस्ट इंडिजचा संघ संघर्ष करत होता आणि शेवटच्या कसोटीतही त्यांना न्यूझीलंडच्या घातक गोलंदाजीसमोर पराभव पत्करावा लागला.न्यूझीलंडने ठेवले वेस्ट इंडिजसाठी ४६२ धावांचे मोठे लक्ष्य : या सामन्यात न्यूझीलंडने वेस्ट इंडिजसाठी ४६२ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा संघ झुंजेल अशी अपेक्षा होती, परंतु कीवी गोलंदाजांच्या घातक गोलंदाजीसमोर पाहुण्या संघाचा पत्त्यांच्या गठ्ठ्यासारखा पराभव झाला. रोस्टन चेसच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिजचा संघ दुसऱ्या डावात १३८ धावांवरच बाद झाला. विशेष म्हणजे वेस्ट इंडिजच्या संघाची पहिली विकेट ८७ धावांवर पडली होती. मात्र यानंतर अवघ्या ५१ धावांत संघानं ९ विकेट गमावल्या. जेकब डफी आणि ऐजाज पटेल चमकले : न्यूझीलंडच्या विजयाचा खरा नायक वेगवान गोलंदाज जेकब डफी होता, ज्यानं दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजच्या पाच फलंदाजांना बाद करुन शानदार आणि उल्लेखनीय कामगिरी केली. जेकब डफीने दोन्ही डावांमध्ये एकूण नऊ विकेट्स घेतल्या आणि वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना स्पर्धेतून बाहेर ठेवले. या घातक कामगिरीमुळे त्याला मालिकावीराचा पुरस्कार मिळाला. त्याने मालिकेतील तीन सामन्यात एकूण २३ विकेट घेतल्या.

### न्यूझीलंडची दुसऱ्या स्थानी मुसंडी; टीम इंडिया कोणत्या स्थानी?

नवी दिल्ली-माऊंट मांघनाई इथे सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटीत वेस्ट इंडिजचा ३२३ धावांनी धुव्वा उडवत न्यूझीलंडने २-० अशी मालिका जिंकली. या विजयासह न्यूझीलंडने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी झेप घेतली.२०२५-२७ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या नव्या आवृत्तीत न्यूझीलंडसाठी ही पहिलीच मालिका होती. तीन सामन्यांपैकी एकात वेस्ट इंडिजने जोरदार संघर्ष केला. त्यामुळे ख्राईस्टचर्च कसोटी अनिर्णित राहिली. न्यूझीलंडने पुढच्या दोन कसोटी जिंकत मालिका जिंकली. सलग दोन कसोटी जिंकत न्यूझीलंडने भारत आणि दक्षिण आफ्रिका यांना मागे टाकत द्वितीय स्थान पटकावले आहे.माऊंट मांघनाई इथे झालेल्या कसोटीत डेव्हॉन कॉनवे आणि टॉम लॅथम या सलाम ीवीरांनी दोन्ही डावात शतक झळकावण्याचा दुर्मीळ विक्रम नावावर केला.फलंदाजांसाठी पोषक खेळपट्टीवर न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. कॉनवे-लॅथम जोडीने ३२३ धावांची खणखणीत सलामी दिली. कॉनवेने ३१ चौकारांसह २२७ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली तर कर्णधार लॅथमने १५ चौकार आणि एका षटकारासह १३७ धावांची खेळी केली. या दोघांच्या दिमाखदार खेळाच्या बळावर न्यूझीलंडने ५७५ धावांवर पहिला डाव घोषित केला.

# भारतीय महिला संघाची विजयी सलामी

विशाखापट्टणम : महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ चे विजेतेपद जिंकल्यानंतर मैदानात उतरलेल्या भारतीय महिला संघाने आपला विजयी रथ कायम ठेवला आहे. श्रीलंका महिला संघाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा ८ विकेट्सने आणि ३२ चेंडू बाकी असताना दणदणीत पराभव केला. या विजयासह भार-ताने मालिकेत १-० ची आघाडी घेतली आहे. जेमिमा रॉड्रिग्जने शानदार फलंदाजी करत आपले १४ वे टी-२० अर्धशतक पूर्ण केले आणि संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरचा निर्णय योग्य ठरला. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या श्रीलंकेची सुरुवात संथ झाली. भारतीय फिरकीपटूंनी धावांवर चांगलाच अंकुश ठेवला होता, त्यामुळे श्रीलंकेच्या फलंदाजांना मोकळेपणाने फटके खेळता आले नाहीत. भारताच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर श्रीलंकेला निर्धारित २० षटकांत ६ बाद १२१ धावांपर्यंतच मजल मारता आली. पदार्पण करणारी युवा फिरकीपटू वैष्णवी शर्माने ४ षटकांत केवळ १६ धावा देत सर्वाधिक प्रभावी गोलंदाजी केली. श्रीलंकेकडून सलामीवीर विश्मी गुणरत्नेने सर्वाधिक ३९ धावा केल्या, मात्र ती धावबाद झाली.

श्रीलंकेची खेळी



**भारताने श्रीलंकेचा ८ विकेट्सने आणि ३२ चेंडू बाकी असताना दणदणीत पराभव केला**

विश्मी गुणरत्नेची एकाकी झुंज : श्रीलंकेकडून सलामीवीर विश्मी गुणरत्ने हिने सर्वाधिक ३९ धावांची (४३ चेंडू) झुंजार खेळी केली. तिने एक बाजू लावून धरत संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र ती दुर्दैवीरीत्या धावबाद झाली. हर्षिता समरविक्रमा : तिने २१ धावांचे योगदान दिले, मात्र एन. श्री चरणीने तिला बाद करून श्रीलंकेचा वेग रोखला. हसिनी परेरा : हसिनीने २० धावा केल्या, पण दीप्ती शर्माने तिला बाद करत मोठी भागीदारी होऊ दिली नाही. कर्णधार चामरी अटापट्टू या सामन्यात मोठी खेळी करण्यात अपयशी ठरली, ज्याचा फटका श्रीलंकेच्या धावसंख्येला बसला.

**भारताचा सहज पाठलाग (१२२ धावा) :**

**विजयासाठी १२२ धावांचे लक्ष्य भारताने केवळ १४.४ षटकांत २ विकेट्स गमावून सहज गाठले. जेमिमा रॉड्रिग्जची निर्णायक खेळी: जेमिमा रॉड्रिग्जने शानदार फलंदाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. स्मृती मानधना : स्मृती मानधनाने २५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली आणि टी-२० फॉरमॅटमध्ये ४००० धावा पूर्ण करणारी पहिली भारतीय फलंदाज बनली. शेफाली वर्मा (९) लवकर बाद झाल्यानंतर, मानधना आणि रॉड्रिग्ज यांनी ५० धावांची भागीदारी करत संघाचा पाया रचला.**

# २०२३ वर्ल्ड कपचा पराभव जिव्हारी लागला; क्रिकेट कायमचा सोडण्याचा विचार केला होता







मुंबई : भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने २०२३ च्या वनडे वर्ल्ड कप फायनलमधील पराभवाबाबत मनमोकळं वक्तव्य केलं आहे. त्या पराभवाने आपण पूर्णपणे खचून गेलो होतो आणि त्या काळात क्रिकेटमधून निवृत्ती घ्यावी, असा विचार मनात आला होता, असं रोहित शर्माने सांगितलं.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यातील पराभव जिव्हारी ला-गलेला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या त्या पराभवानंतर आपण मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे खचल्यासारखं वाटत होतं, असंही रोहितने नमूद केलं. त्या वर्ल्ड कपसाठी आपण २०२२ मध्ये कर्णधारपद स्वीकारल्यापासूनच सर्वस्व पणाला लावलं होतं, असं त्याने स्पष्ट केलं.

भारतामध्ये झालेल्या या वर्ल्ड कपमध्ये रोहित शर्माने दमदार फलंदाजी करत ११ सामन्यांत ५४.२७ च्या सरासरीने ५९७ धावा केल्या होत्या. मात्र, अंतिम फेरीत भारतीय फलंदाज अपेक्षेप्रमाणे खेळ करू शकले नाहीत. भारताने २४० धावांचं आव्हान उभं केलं होतं, जे ऑस्ट्रेलियाने सहज पार केलं.

या पराभवानंतर संपूर्ण देश निराश होता. जे घडलं त्यावर विश्वास बसत नव्हता, असं सांगत रोहित म्हणाला की वैयक्तिक आयुष्यातील तो काळ त्याच्यासाठी अत्यंत कठीण होता. त्या क्षणी मला आता यापुढे आणखी क्रिकेट खेळायचं नाही, असं प्रामाणिकपणे वाटलं होतं, असंही रोहितने कबूल केलं.

मात्र, या अपयशानंतर रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने दमदार पुनरागमन केलं. २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये भारताने विजेतेपद पटकावलं. त्यानंतर रोहितने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. पुढे कसोटी क्रिकेटमधूनही त्याने निवृत्ती घेतली असून सध्या तो भारतासाठी केवळ वनडे क्रिकेट खेळत आहे.



# पाकिस्तानच्या नक्वीचा भारताच्या १९ वर्षांखालील क्रिकेटपटूंनी केला अपमान

मुंबई : जेतेपदाच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने समीर मिन्हासच्या धमाकेदार शतकाच्या जोरावर ३४७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाचा संघ फक्त १५६ धावांवर आटोपला. वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांच्यासह अन्य खेळाडूंना मोठी खेळी करता आली नाही. दरम्यान, भारत आणि पाकिस्तानच्या अंतिम सामन्यानंतर पुन्हा एकदा राडा झाल्याचे समोर आले.

पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) आणि आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) चे अध्यक्ष मोहसीन नक्वीचा भारतीय संघाकडून पुन्हा एकदा अपमान करण्यात आला आहे. अंडर-१९ आशिया कप स्पर्धेतील अंतिम सामन्यानंतर भारतीय संघाच्या खेळाडूंनी नक्वीकडून पदके स्वीकारण्यास नकार दिला. मोहसीन नक्वी यांनी वैयक्तिकरीत्या पाकिस्तान संघाला अंडर-१९ आशिया कप ट्रॉफी सादर दिली.

मोहसीन नक्वी अंतिम सामन्यादरम्यान सादरीकरण समारंभात भाग घेण्यासाठी दुबईला पोहोचले होते. मो-हसीन नक्वीने पहिली जे-तेपद पटकावणाऱ्या पाकिस्तान संघाच्या खेळाडूंना पदके दिली. त्यानंतर पाकिस्तानचा कर्णधार फरहान युसूफच्या हातात ट्रॉफी दिली. भारतीय खेळाडूंनी मोह-सीन नक्वीकडे दुर्लक्ष केले.

# आमच्याकडे जिंकण्याची संधी होती, पण..., शुभमन गिलने सांगितलं पराभवाचं कारण, टीम इंडियाच्या चुकांवर ठेवलं अचूक बोट

**नवी दिल्ली** : बेन डकेटचं शतक आणि झॅक क्राऊली, ज्यो रुटच्या अर्धशतकांच्या जोरावर इंग्लंडनं लीड्स कसोटी ५ विकेट्सनी जिंकली. चुरशीच्या झालेल्या या सामन्यात भार-तानं इंग्लंडला ३७१ धावांचं आव्हान दिलं होतं. इंग्लंडनं पाचव्या दिवशीच्या शेवटच्या सत्रात हे आव्हान आरामात पार केलं. सलामीच्या बेन डकेटनं २१ चौकार आणि एका षटकारासह १४९ धावांची खेळी केली. त्यानं क्राऊलीसह १८८ धावांची भक्कम सलामी देऊन इंग्लंडच्या विजयाचा पाया रचला. क्राऊलीनं ६५ धावांचं योगदान दिलं. त्यानंतर ज्यो रुटनं बेन स्टोक्स आणि जेमी स्मिथच्या साथीनं विजयाचे सोपस्कार पूर्ण केले.

टीम इंडियाच्या चार फलंदाजांनी इंग्लंड दौऱ्यातल्या या पहिल्याच कसोटीत पाच शतकं झळकावली होती. पण दोन्ही डावातल्या खराब क्षेत्ररक्षणा-चा भारतीय संघाला फटका बसला. दरम्यान यजमान इंग्लंडनं लीड्स कसोटी जिंकून पाच सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या कसोटीतील पराभवानंतर कर्णधार शुभमन गिलने टीम इंडियाच्या चुकांवर अचूक बोट ठेवलं.पहिल्या पराभवानंतर भारताचा कर्णधार शुभमन गिल म्हणाला?





शुभमन गिल म्हणाला की, हा एक अप्रतिम टेस्ट सामना होता. आमच्याकडे संधी होत्या, पण सोडलेल्या झेल आणि खालच्या फळीतील फलंदाजांचा अपयश यामुळे किंमत मोजावी लागली. काल आम्ही विचार करत होतो की इंग्लंडला ४३० चं लक्ष्य देऊ, पण शेवटचे विकेट्स फक्त २५ धावांत गेल्या. आजही, पहिल्या विकेटनंतर आम्हाला वाटलं की सामना आपल्या हातात येईल, पण त्यानंतर संधी हातातून निसटल्या.पुढे तो म्हणाला, पहिल्या डावातील कोलॅप्सबाबत आम्ही चर्चा केली, अशा चुका होतात, पण त्या दुरुस्त कराव्याच लागतील. अशा खेळपट्ट्यांवर संधी सहज मिळत नाहीत, पण आमचा संघ युवा आहे आणि शिकत आहे. त्या चुका सुधारण्याचा आम्ही प्रयत्न करू.

शेवटी शुभमन गिल म्हणाला की, पहिल्या सत्रात आम्ही अतिशय शिस्तबद्ध आणि अचूक गोलंदाजी केली. फारशा धावा दिल्या नाहीत, पण एकदा चेंडू जुना झाला की धावांचा ओघ थांबवणं कठीण जातं. त्यामुळे चेंडू जुना झाल्यावर सतत विकेट्स घेणं महत्त्वाचं ठरतं. जडेजाने अफलातून गोलंदाजी केली, संधी तयार केल्या, पण एक झेल असाही होता जो पंतच्या लक्षात आला नाही, असं घडतं कधी कधी.बुमराह कोणते सामने खेळणार?

बुमराहबाबत हा प्रश्न विचारला असता कर्णधार शुभमन गिल म्हणाला, हे प्रत्येक सामन्याच्या आधी ठरवलं जातं. आता बराच मोठा ब्रेक आहे, त्यामुळे पुढील सामन्याच्या जवळ आल्यावरच त्याबाबत निर्णय घेतला जाईल.

# वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत भारतीय संघाची सहाव्या स्थानावर घसरण



**नवी दिल्ली :** माऊंट मांघनाई इथे सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटीत वेस्ट इंडिजचा ३२३ धावांनी धुव्वा उडवत न्यूझीलंडने २-० अशी मालिका जिंकली. या विजयासह न्यूझीलंडने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी झेप घेतली.

२०२५-२७ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या नव्या आवृत्तीत न्यूझीलंडसाठी ही पहिलीच मालिका होती. तीन सामन्यांपैकी एका सामन्यात वेस्ट इंडिजने जोरदार संघर्ष केला. त्यामुळे ख्राईस्टचर्च कसोटी अनिर्णित राहिली. न्यूझीलंडने पुढच्या दोन कसोटी जिंकत मालिका जिंकली. सलग दोन कसोटी जिंकत न्यूझीलंडने भारत आणि दक्षिण आफ्रिका यांना मागे टाकत द्वितीय स्थान पटकावले आहे. माऊंट मांघनाई इथे झालेल्या कसोटीत डेव्हॉन कॉनवे आणि टॉम लॅथम या सलामीवीरांनी दोन्ही डावात शतक झळकावण्याचा दुर्मिळ विक्रम नावावर केला.

रविवारी ऑस्ट्रेलियाने ॲडलेड कसोटी जिंकत ॲशेसवर कब्जा केला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने गुणतालिकेत जोरदार भरारी घेतली. ऑस्ट्रेलियाने नव्या आवृत्तीत सलग सहा विजय मिळवत अव्वल स्थानी घट्ट पकड राखली आहे. त्यांचे ७२ गुण झाले आहेत. न्यूझीलंडने वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका जिंकत २८ गुणांसह दुसरे स्थान गाठलं आहे. गतविजेता दक्षिण आफ्रिकेचा संघ तिसऱ्या स्थानी आहे. त्यांनी चारपैकी तीन कसोटी जिंकल्या आहेत. श्रीलंका १६ गुणांसह ४ तर पाकिस्तानचा संघ १२ गुणांसह पाचव्या स्थानी आहे. घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभूत झाल्याने भारतीय संघाची सहाव्या स्थानी घसरण झाली आहे. ॲशेस मालिकेत सुमार कामगिरी करणारा इंग्लंडचा संघ सातव्या स्थानी आहे. बांगलादेश आठव्या तर वेस्ट इंडिज नवव्या स्थानी आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये गुण कसे मिळतात ?

कसोटी जिंकल्यास १२ गुण.
टाय झाल्यास ६ गुण.
अनिर्णित झाल्यास ४ गुण.
गुणतालिकेतील अव्वल दोन संघ फायनलसाठी पात्र ठरतात.
षटकांची गती संथ राखल्याबद्दल गुण कमी केले जातात.

पान २ वरून...

## भारतीय शेतकरी जीवनातील सामाजिक संकटांची हकीकत

निराशा यांना सामोरे जातात. सामाजिक स्वीकार, आत्म-आदर, कुटुंबातील भूमिका आणि समाजातील स्थान हे घटक त्यांच्या मानसिक स्थितीवर प्रभाव टाकतात. जेव्हा शेतकरी आर्थिक दृष्ट्या कमजोर असतो आणि सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते, तेव्हा मानसिक तणाव व सामाजिक दबाव यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला गंभीर आव्हान देतो, ज्यामुळे आत्महत्येच्या घटनांची शक्यता वाढते.

ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक असमानता, पायाभूत सुविधा व सामाजिक सुरक्षा यंत्रणांचा अभाव, आरोग्य व शिक्षण सुविधांचा मर्यादित विस्तार, सूचना व प्रशिक्षणाची कमतरता, महिला व पुरुष शेतकऱ्यांमध्ये उपलब्ध संसाधनांचा फरक आणि सामाजिक सहभाग यांचा परिणाम त्यांच्या जीवनातील मानसिक प्रश्नांवर दिसून येतो. जिथे सामाजिक-संस्कृतिक वातावरण मजबूत आहे, तिथे सामाजिक समर्थन, समुदायातील सहकार आणि पारिवारिक आधार यामुळे शेतकऱ्यांना मानसिक ताणातून बाहेर पडण्याची अधिक क्षमता असते, परंतु जिथे सामाजिक एकांतता, आर्थिक दबाव आणि समर्थनाचा अभाव आहे, तिथे शेतकरी व मजूर समुदायाला आत्महत्यांकडे वळण्याचा अधिक धोका जाणवतो. ग्रामीण समाजातील सामाजिक नेटवर्क आणि पारंपारिक सहायता पद्धतींचा परिणाम आत्महत्यांच्या घटनांवर नकारात्मक स्वरूपात दिसतो, कारण जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व मानसिक आधार मजबूत होत नाही, तोपर्यंत व्यक्ती स्वतःच्या स्थितीशी संघर्ष करत असतात, आणि शेवटी हा संघर्ष त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम दर्शवतो.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमागील सामाजिक मूल्यांचे विश्लेषण हे आपल्याला सांगते की सामाजिक निर्बंध, पारंपारिक प्रतिष्ठा, कुटुंबीय अपेक्षा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक-मानसिक दबाव हे सर्व घटक एका गुंतागुंतीच्या संयोगातून त्यांच्या जीवनावर दबाव टाकतात. ग्रामीण समाजात आर्थिक संधींचा अभाव, सामाजिक सुरक्षा व विमा या यंत्रणांचा अपुरा विस्तार, मानसिक समुपदेशन सुविधा नाहीत किंवा मर्यादित आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मानसिक संघर्षाचे मुक्तपणे भाष्य करण्याची व उपाय शोधण्याची संधी कमी मिळते. यामुळे त्यांना आयुष्यातील समस्यांचा सामना करताना त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणाशी जुळवून घ्यावे लागते, आणि हे संघर्ष त्यांच्या मानसिक स्थितीवर खोल परिणाम करतात ज्यातून आत्महत्या सारख्या चरम निर्णयाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढते.

शेतकरी आत्महत्यांच्या आकड्यांमागील सामाजिक प्रतिमांचा अभ्यास करताना असे दिसून येते की आर्थिक धोरणे, बाजार व्यवस्था, शासकीय योजना, कृषी विमा, न्यूनतम समर्थन मूल्य आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांचा प्रत्यक्ष परिणाम जमिनीवर कसा लागू होत आहे, हेही महत्त्वाचे आहे. अनेक वेळा योजनांचे प्रत्यक्ष कार्यान्वयन, पारदर्शकता, वैयक्तिक व सामाजिक मतभेद, स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता यांचे मिश्रित परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात दिसतात. कृषी विमा योजना प्रत्यक्षात उपयोगी पडत नाहीत किंवा तितक्या परिणामकारकपणे लागू होत नाहीत, चा लाभशून्य होतो, कर्ज परतफेडीची वेळ व व्याज यांचा दबाव वाढतो, आणि उत्पादन खर्चाचा भार अधिकच वाढतो. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता आणि तणाव हे वाढते आणि सामाजिक प्रतिष्ठा व आत्म-आदर यांच्यात विरोधाभास निर्माण होतो, ज्याचा मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होतो. राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आमच्या समाजाला एक चिंतनात्मक व व्यापक दृष्टीकोनातून शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक तणाव, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील जटिल नाते समजून घेण्याची संधी देतो. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की शेतकरी समुदाय केवळ अन्नाचे उत्पादक नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानसिक दृष्टिकोनातून आपला समाज टिकविणारा पाया आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण फक्त आर्थिक उपाययोजना किंवा कृषी सुधारणा पुरते मर्यादित नसून, सामाजिक सुरक्षा, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण व प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, आर्थिक समावेशन, सामाजिक सहभाग व पिकांच्या बाजारभावाचे संरक्षण यांचा एक समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सामाजिक नेटवर्क, समुदाय आधारित सहयोग, आरोग्य व मनोवैज्ञानिक समर्थन, कुटुंबीय सल्ला, समुपदेशन, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय हे सर्व घटक एकत्रितपणे शेतकऱ्यांना स्थिर व सकारात्मक भवितव्याकडे मार्गदर्शन करू शकतात.

शेवटी, राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आपल्या सामाजिक धारणा व मूल्यांना नव्याने परिभाषित करण्याची, शेतकऱ्यांना सन्मान, सुरक्षा, प्रतिष्ठा आणि गरिमापूर्ण जीवनमान देण्याची एक सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. शेतकरी संकट हे फक्त कृषीशी निगडीत समस्या नाही, तर सामाजिक-मानसिक-आर्थिक समग्र समस्या आहे, आणि त्याचे निराकरण करण्यासाठी शासन, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सरसकट नागरिकांनी एकत्र येऊन व्यापक सामाजिक व धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शेतकरी दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे ध्येय आणि त्यांच्या संघर्षाचे सामाजिक परिणाम हे आपल्या सर्वांचे कल्याण आणि प्रगती यांना जोडलेले आहेत, आणि त्या दिशेने सामाजिक न्याय, आर्थिक सुरक्षा व मानसिक आरोग्य सुनिश्चित करणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे.

# सोलापूरच्या भूमीत सुवर्णकारांचा गौरव सोहळा : कर्तृत्व आणि प्रबोधनाचा महासंगम

**सोलापूर/प्रतिनिधी :** स्वातंत्र्य लढ्यातील अद्वितीय बलिदानामुळे जगभरात, ''हुतात्म्यांचे शहर'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर नगरीत येत्या रविवार दि. २८ डिसेंबर रोजी निर्मिती लॉन्स, विजयपूर रोड येथे सकाळी १० वाजता सोनार समाजाच्या महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, तसेच सोनार समाजातील स्वातंत्र्याचे शिलेदार सुवर्ण रत्न स्वातंत्र्य सैनिक प्रल्हादराव कारीकर, रामचंद्र पोतदार, मधुकरराव वेदपाठक, श्रीधर पंडित, सुवर्ण रत्न समाज भूषण महादेव मंद्रूपकर, रंगनाथ आण्णा कुरुलकर, श्यामकांत मैंदर्गीकर, औदुंबरराव कळमणकर, प्रा. नागनाथराव धाराशिवकर, दिनकरराव क्षीरसागर उर्फ आष्टीकर वकील साहेब, वसंतराव अंजनगावकर, राज्य उत्पादन शुल्क चे जिल्हा अधीक्षक अशोकराव उपळाईकर, शंकरराव पंडित झरेगावकर यांच्या स्मृतीना अभिवादन करून सोनार समाज सन्मान सोहळा व शासकीय योजना माहिती शिबीर या महाकुंभाच्या माध्यमातून संपन्न होत आहें. काळ बदलतोय तशी समाजाची समीकरणं ही बदलतायत. पूर्वी केवळ सराफ व्यवसाय, सुवर्ण कारागीर व्यवसाया पुरता मर्यादित असलेला सोनार समाज आज, शिक्षण, प्रशासन, अभियांत्रिकी, वैध्यकीय अशा सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकवत आहे. आपल्या समाजातील रत्नाना शोधून त्यांचा यथोचित गौरव करणे , कोणताही समाज तेंव्हाच प्रगत होतो जेंव्हा तो आपल्यातील गुणवंतांची कदर करतो आणि बदलत्या काळात शासकीय योजनांच्या मदतीने समाजाचा आर्थिक पाया भक्कम करणे ही काळाची गरज आहे. याच उदात हेतूने संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या भक्तीने पुनीत झालेल्या आणि चार हुतात्म्याच्या बलिदानाने अजरामर झालेल्या हुतात्मा नगरी सोलापूर च्या भूमीत दिनांक २८ डिसेंबर रोजी एक ऐतिहासिक सोहळा आकाराला येत आहे.




**कर्तृत्वाचा सन्मान -समाज भूषण आणि विशेष पुरस्कार**

केवळ व्यवसायात यश मिळवणे म्हणजे प्रगती नाही. तर सामाजिक ऋणाची जाणीव ठेऊन समाजाला कांहीतरी देणे म्हणजे खरी प्रगती. या सोहोळ्यात राज्यभरातून प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून ३६ समाज भूषण व्यक्तींची निवड करण्यात आली आहे, ''हिरकणी'' पुरस्काराच्या माध्यमातून नारी शक्तीचा सन्मान, तर आदर्श शिक्षक रत्न, उद्योगातील सुवर्ण रत्नांचा, गौरव करून हा समाज केवळ सोन्याची शुद्धता तपासणारा नसून गुणांची शुद्धता ओळखणारा आहे. हेच अधोरेखित होत आहे.



मोहन मंद्रूपकर अग्रणी प्रवर्तक



संजय मैंदर्गीकर अग्रणी प्रवर्तक



संतोष कळमणकर अग्रणी प्रवर्तक

**पंढरपूर मंदिर समिती - श्रद्धेचा जागर**

आपल्या समाजाचे आराध्य दैवत श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज ! त्यांच्या समाधी मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या पंढरपूर मंदिर समितीच्या नव नियुक्त कार्यकारी मंडळाचा सत्कार या सोहळ्याचा, ''भक्ती आणि शक्ती'' यांचा संगम असणार आहे. माजी अध्यक्ष श्री. भारत कारीकर, विध्यमान अध्यक्ष श्री आनंद पालकर, उपाध्यक्ष मोहन मंद्रूपकर, कार्यवाह संजय आष्टीकर, खजिनदार सुरेश पंडित जेष्ठ विश्वस्त सुभाषदादा वेदपाठक आणि त्यांच्या टीम ने मंदिराच्या लौकीकात भर घातली आहे. त्यांचा नागरी सत्कार हा कृतज्ञेचा भाग आहे.

**प्रबोधनातून प्रगतीकडे- शासकीय योजनांचे महत्व**

अनेकदा माहितीच्या अभावाने कारागीर, समाज बांधव केंद्र आणि राज्य सरकारच्या लाभापासून वंचित राहतात. म्हणून वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौं. मृणालिनी मैदर्गीकर, उद्योजक श्री. भारत कारीकर, अग्रणी प्रवर्तक तथा सराफ व्यावसायिक सर्वश्री मोहन मंद्रूपकर, संजय मैंदर्गीकर, संतोष कळमणकर, संपादक विनोद पोतदार, सामाजिक कार्यकर्ते सुनील पंडित, तसेच ९६ वर्षीय जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक समाज भूषण श्री. वसंतराव पोतदार आलूरकर या वयातही आवाहन केले आहे. संत नरहरी आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजना, महाराष्ट्र उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, पंतप्रधान व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, पी. एम. विश्वकर्मा योजना, मुद्रा योजना या योजना केवळ कागदावरच्या नसून त्या सुवर्ण कारागीरांच्या, सोनार बांधवांच्या जीवनात क्रांती घडवू शकतात. या शिबिरात तज्ञाचें मार्गदर्शन लाभणार असल्याने सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतीना रोजगाराच्या नवीन वाटा सापडतील.

**युवा नेतृत्वाची साथ**

या उपक्रमात इंजिनियर गोरक्ष वेदपाठक मोडनिंब, इंजिनियर प्रथमेश वेदपाठक माढा, उच्च शिक्षित अभिषेक पोतदार वागदरी यासारख्या उच्च शिक्षित युवा सराफ उद्योजकांनी घेतलेला पुढाकार हा समाज, ''आधुनिक'' होत असल्याचे लक्षण आहे . जेंव्हा तरुणाई अशा सामाजिक उपक्रमात उतरते तेंव्हा समाजाचा पाया अधिक मजबूत होतो.

**समाज बांधवाना कळकळीचेआवाहन**

हा केवळ कार्यक्रम नसून सोनार, सुवर्णकार समाजाच्या अस्मितेचा आणि एकात्मतेचा हुंकार आहे. आपल्या समाजातील कर्तृत्वान ''रत्नांचा'' गौरव पाहण्यासाठी आणि राज्य आणि केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी योजनांची माहिती घेऊन आपला व्यवसाय आणि भविष्यातील प्रगती साधण्यासाठी एक ''सुवर्णसंधी'' आहे. सोलापुरात होणारा हा राज्यातील पहिलाच असा, ''मल्टी पर्पज'' कार्यक्रम समाज हितासाठी मैलाचा दगड आहे.

माहितीच्या आभावामुळे कोणताही बांधव वंचित राहू नये हा या मागचा शुद्ध हेतू आहे. तरी २८ डिसेंबर रोजी सोलापूर च्या या ऐतिहासिक सोहळ्याला सोनार, सुवर्णकार बांधव भगिनींनी मोठया संख्येने उपस्थित राहावे. सोनार समाजाच्या या प्रगती पथावरील प्रवासात सर्वांनी वाटेकरी व्हावे आणि एकजुटीचे

# राज्यातील उद्योगांना महावितरणच्या ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलने नवी ऊर्जा

## - तक्रार निवारणाचा वेगही सुसाट; दर्जेदार सेवेचे दमदार पाऊल

## - २७८ औद्योगिक संघटना थेट संवादासाठी २४७ 'कनेक्टेड'

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील ४ लाख ४८ हजार उच्चदाब व लघुदाब औद्योगिक वीजग्राहकांना महावितरणकडून जागतिक दर्जाची तत्पर वीजसेवा देण्याची प्रक्रिया ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलमुळे अतिशय पारदर्शक व वेगवान झाली आहे. उद्योगांना वाढीव वीजभाराच्या मागणीनुसार सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होण्यासोबतच विविध प्रश्न व तक्रारी सोडविण्याचा वेगही वाढला आहे. यासह महावितरणसोबतच २४७ थेट संवाद साधण्यासाठी या पोर्टलद्वारे राज्यातील २७८ औद्योगिक संघटना 'कनेक्टेड' झाल्या आहेत.

दरम्यान ऑनलाइन पोर्टलसह औद्योगिक संघटना व वीज ग्राहकांसोबत स्थानिक अधिकाऱ्यांच्या बैठकांसह महावितरणच्या थेट मुख्यालयातून संचालक व कार्यकारी संचालक स्तरावर व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्वतंत्र बैठका घेण्यात येत आहेत. विशेष म्हणजे वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, बिलिंग व इतर मुद्द्यांबाबत औद्योगिक संघटना व ग्राहकांनी मांडलेल्या प्रश्नांच्या निराकरणासाठी महावितरणने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) माहितीसाठी या पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. आतापर्यंत १२४ कार्यपूर्ती अहवाल अपलोड करण्यात आले आहेत. पोर्टलद्वारे व बैठकांमध्ये प्राप्त झालेल्या विविध २४२ पैकी २१५ तक्रारींचे ताबडतोब निराकरण करण्यात आले तर ऊर्वरित २७ प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन वीजयंत्रणा उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.




महावितरणकडून औद्योगिक वर्गवारीत लघु व उच्चदाबाच्या दरवर्षी सुमारे २३ हजारांवर नवीन वीजजोडण्या देण्यात येतात. सद्यस्थितीत औद्योगिक ग्राहकांचा एकूण वीजवापरात ४३ टक्के तर महसुलात ४१ टक्के वाटा आहे. राज्यातील औद्योगिक ग्राहकांना थेट संवादासाठी, विविध प्रश्न मांडण्यासाठी तसेच प्रश्नांचे पारदर्शक पद्धतीने व तत्पर निराकरण करण्यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती करण्याची सूचना मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने औद्योगिक ग्राहक व संघटनांसाठी www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्र 'स्वागत सेल' पोर्टल कार्यान्वित केले आहे. महावितरणच्या 'स्वागत सेल' पोर्टलवर लॉगिनद्वारे लघु व उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना वीजभार वाढीसह विविध ग्राहकसेवांसाठी मागणी अर्ज तसेच वीजपुरवठा व बिलिंगबाबतच्या तक्रारी करणे सोयीचे झाले आहे. ऑनलाइन अर्ज किंवा तक्रारींबाबत ताबडतोब कार्यवाही करण्यात येत आहे. यासह वीजसेवेसंबंधी सूचना, प्रश्न किंवा विविध मुद्द्यांवर थेट संवाद साधण्यासाठी औद्योगिक संघटनांना स्वतंत्र लॉगिनद्वारे 'स्वागत सेल' पोर्टलवर विशेष स्थान देण्यात आले आहे. राज्यातील २७८ औद्योगिक संघटनांनी लॉगिनद्वारे नोंदणी केली आहे. यात पुणे प्रादेशिक विभागातील ८७, कोकण- ८३, नागपूर- ८० आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील २८ औद्योगिक संघटनांचा समावेश आहे.

राज्यभरातील लघु व उच्चदाब औद्योगिक वीजग्राहकांसह विविध औद्योगिक संघटनांकडून महावितरणच्या ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलचे स्वागत होत आहे. नियमित संवादासह वीजसेवेचे विविध प्रश्न व मागण्या ताबडतोब मार्गी लागत असल्याने औद्योगिक ग्राहकांच्या वीजसेवेला महावितरणच्या ऑनलाइन पोर्टलमुळे नवी ऊर्जा मिळाली आहे.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्राम उत्साहात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बीसीए, बीबीए, एमसीए व एमबीए प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा इंडक्शन कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर येथील माजी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विश्वास शेंबेकर उपस्थित होते. आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी आयुष्यात मिळणाऱ्या प्रत्येक संधीचे योग्य नियोजन करून तिचे सोने कसे करावे, याबाबत सखोल व प्रभावी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. टी. चव्हाण, बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची सविस्तर ओळख करून देण्यासाठी कॅम्पस व्हिजिटचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस व्हिजिटदरम्यान विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील ग्रंथालयाची माहिती देण्यात आली. ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांनी ग्रंथालयातील नियम, उपलब्ध सुविधा तसेच विविध शैक्षणिक व वाचनविषयक उपक्रमांची ओळख करून दिली. यासोबतच मुलींची व्यायामशाळा, मुलींचे वसतिगृह, स्पोर्ट्स ग्राउंड तसेच विविध क्रीडा सुविधांची माहिती देण्यात आली. डॉ. अशोक वाघमारे यांनी विविध खेळांची माहिती देत विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी काही खेळांचे आयोजनही करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते यांनी केले. इंडक्शन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. क्षितिज कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका स्नेहल पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी बीसीए व बीबीए विभागातील सर्व प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले. विशेष म्हणजे दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली.

# केशवराजमध्ये रामानुजन जयंतीनिमित्त गणित प्रश्नमंजुषा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात २२ डिसेंबर २०२५ सोमवार रोजी गणित दिनानिमित्त म्हणजेच थोर गणिततज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी, प्रमुख पाहुणे चि. सुरज बजाज (दहावी ड), पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी व इंदू ठाकूर यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या चि. सुरज बजाज याने थोर गणिततज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांच्या जीवन कार्याचा




परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. त्यानंतर अध्यक्षीय समारोप करताना पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील प्रत्येक गोष्टीत गणित आहे. गणित हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी गणिताचा सखोल अभ्यास करून गणितात संशोधन करावे, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

यानंतर इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या सर्व तुकड्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग असणारी गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा अतिशय उत्साहात घेण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत कु. नम्रता पंडित हिने केले. सूत्रसंचालन कु. सृष्टी श्रीमंगले व कु. दीक्षा मोतीपवळे यांनी केले. आभारप्रदर्शन कु.श्रीमयी सुगावे हिने केले तर सामूहिक कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात इ. दहावीच्या विद्यार्थ्यांचा मोलाचा सहभाग होता.

गणित विभागांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, गणित विषय प्रमुख शैलजा देशमुख, कार्यक्रम प्रमुख प्रज्ञा नाईक, सर्व गणित विषय शिक्षक तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाअंतर्गत इस्रोच्या दोन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाअंतर्गत इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) आयोजित *एरोसोल : मेजरमेंट्स रिट्रीवल अँड इम्पॅक्ट* व *अंडरस्टँडिंग द सायन्स बिहाइंड जिऑलॉजिकल हजार्ड्स फोर अर्ली वार्निंग अँड मेगिटेशन मेजर्स* या दोन राष्ट्रीय ऑनलाइन कार्यशाळा दिनांक १७ व १९ डिसेंबर रोजी राबवण्यात आल्या.

रामकृष्ण परमहंस महाविद्यालय हे भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) चे आऊटरिच नोडल सेंटर म्हणून कार्य करते, या अंतर्गत इस्रो आयोजित विविध कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित केले जातात. याच अंतर्गत या दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत वायू प्रदूषण आणि आरोग्य, एरोसोल व त्याचे परिणाम, नवीन तंत्रज्ञान, जागतिक समस्या व नियंत्रणासाठीच्या उपाय योजना अशा विविध घटकांबद्दल सखोल मार्गदर्शन व चर्चा इस्रोतील शास्त्रज्ञांनी केली. एरोसोल हे हवेतील सूक्ष्म कण असतात, जे वाहनांमधून निघणारा धूर, औद्योगिक उत्सर्जन आणि इतर घटकांमुळे तयार होतात. हे कण श्वसनमार्गात जाऊन फुफ्फुसांना नुकसान पोहोचवतात आणि आरोग्याच्या समस्या निर्माण करतात. तसेच पर्यावरणातील बदल, प्रदूषण व आपली जबाबदारी याबद्दलचे सखोल मार्गदर्शन सदर कार्यशाळेमध्ये करण्यात आले.

सदर कार्यशाळेसाठी इस्रो देहरादून येथील डॉ. सुरेश चॅटर्जी, डॉ. प्रतिमा पांडे, डॉ. फरहान काझी व डॉ. मनू शर्मा असे विविध शास्त्रज्ञ व अभ्यासक साधन व्यक्ती म्हणून लाभले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभाग प्रमुख व इसरो नोडल सेंटर समन्वयक डॉ. कुणाल वनंजे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. अभयसिंह खुणे यांनी केले तर आभार प्रा. संजय घोडके यांनी मानले. या कार्यशाळेसाठी आय क्यू ए सी समन्वयक डॉ. मंगेश भोसले, प्रा.अक्षय स्वामी, प्रा. गोविंद साळुंखे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# कळंब नगर परिषदेवर शिवसेना भाजप महायुतीचा भगवा फडकला
## नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या राणी उर्फ सुनंदा कापसे यांचा विजय

कळंब (प्रतिनिधी)-येथील नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी शिवसेना-भाजपच्या राणी उर्फ सुनंदा कापसे या २२५४ मतांनी विजयी झाल्या आहेत . त्याचबरोबर भाजप व शिवसेना गटाचे १० नगरसेवक ही निवडून आणण्यात यश आले आहे . तर उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व काँग्रेस यांच्या पदरात केवळ १० नगरसेवक निवडून आले तर अजित पवार (गट ) व शरद पवार (गट ) राष्ट्रवादी यांच्या मात्र चांगला सुपडा साफ झाला आहे . संपूर्ण निवडणूक ही तिरंगी झाली होती, मात्र त्यांना एकाही जागेवर यश प्राप्त झाले नाही .

कळंब नगर परिषदेच्या एक नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार रिंगणात होते त्यात शिवसेना-भाजप महायुतीचे राणी उर्फ सुनंदा शिवाजी कापसे यांना ७ हजार ६८९ मते मिळाली तर त्यांचा २२५४ मतांनी त्या विजयी झाल्या त्यांच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे (गट ) व काँग्रेस यांच्या युतीमधून रश्मी संजय मुंदडा या उभ्या होते त्यांना ५ हजार ४३५ मते मिळाली तर तिसऱ्या नंबर वर फेकल्या गेलेल्या अजित पवार व शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या मीनाक्षी श्रीधर भवर यांना १७६० मते मिळाली . राष्ट्रवादी गटाकडून एकही नगरसेवक मात्र खाते उघडू शकले नाहीत . कळंब नगर परिषदेची निवडणूक २ डिसेंबर रोजी १० प्रभागात २० नगरसेवक पदासाठी झाली यात एकूण नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार रिंगणात होते तर २० नगरसेवक पदासाठी ६७ उमेदवार रिंगणात होते शहरात एकूण २४ मतदान केंद्रावर २० हजार ९५८ मतदारापैकी १५ हजार २३४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता, तर या मतदानाची मतमोजणी २१ डिसेंबर रविवार रोजी सकाळी १० वाजता शहराबाहेर असलेल्या श्री संत गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सकाळी १० वाजता सुरू झाली यात १० टेबलवर ३ फेऱ्यात ही मतमोजणी संपन्न झाली . यात विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे प्रभाग १ (अ ) मधून योजना अनंत वाघमारे ५९५ (कमळ ) प्रभाग १ (ब )मधून शीतल चोंदे (कमळ ) यांनी ५१५ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग २ (अ) मधून ज्योती हरकर

**पोलिस प्रशासनाने उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, पोलीस निरीक्षक अजित चिंतले, सहाय्यक पोलीस निरीक्षक-४, पोलीस उपनिरीक्षक-३, पोलीस कर्मचारी -७५ व होमगार्ड -५० असे मिळून १३३ पोलीस कर्मचारी यांची बंदोबस्तासाठी नेमणूक करून शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता .**

( मशाल) यांनी ८२६ मते घेऊन तर प्रभाग २ ( ब ) मधून खाटीक जमील महंमद (मशाल ) यांनी ७१७ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ३ (अ )मधून इंदुमती हौसलमल (मशाल) यांनी ८८६ मते घेऊन तर प्रभाग ३ (ब ) मधून रोहन पारख (धनुष्यबाण ) यांनी ८६१ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ४ (अ) मधून लखन गायकवाड (कमळ ) ५४६ मते घेऊन तर प्रभाग ४ (ब )मधून आशा भवर (मशाल) यांनी ७२४ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ५ (अ ) मधून सागर मुंडे (मशाल )यांनी ८२० मते घेतली तर प्रभाग ५ (ब ) मधून सफुरा शकील काझी ( मशाल) यांनी ७७८ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ६ ( अ ) मधून हर्षद अंबुरे (कमळ ) यांना ५८५ मते मिळाली तर प्रभाग ६( ब) मधून अर्चना मोरे यांनी (हात) या चिन्हावर ६५८ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ७(अ) मधून पूजा धोकटे या (धनुष्यबाण) घेऊन यांना ८९४ मते मिळाली तर प्रभाग ७ (ब ) मधून अमर चाऊस (धनुष्यबाण ) यांना १०४९ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ८(अ) मधून वनमाला वाघमारे (मशाल ) यांनी ६५७ मते घेतली तर प्रभाग ८( ब )मधून मोसिन सलीम मिर्झा (मशाल ) यांनी ७०२ मते घेऊन विजयी झाले आहेत . प्रभाग ९-अ मधून रुकसाना बागवान (मशाल )यांना ६२७ मते मिळाली तर प्रभाग ९ - ब - मधून अतुल कवडे (धनुष्यबाण) यांनी ७४१ मते घेऊन विजयी झाले आहेत . तर प्रभाग १० (अ ) मधून शाला शिवा पवार (कमळ ) यांनी ५०६ मते घेतली तर प्रभाग १० (ब) मधून भूषण करंजकर (कमळ ) ८१९ मते घेऊन विजयी मिळवला आहे . या निवडणुकीत भाजपाला ६

**मतमोजणी प्रक्रियेवर निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार हेमंत ढोकले, सहा .निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, श्रीमती मंजुषा गुरमे, निवडणूक निरीक्षक प्रबोधय मुळे व अति. सहा .निवडणूक निर्णय अधिकारी गोकुळ भराडीया यांच्या नियंत्रणा खाली अजय काकडे, महेश माने, प्रदीप ठोंबरे ,प्रतीक हौसलमल, शंकर पाच भाई , गणेश गपाट, पंडित जाधव यांनी ही मतमोजणी प्रक्रिया पार पडली आहे.**

धनुष्यबाणाला ४ मशालीला ९ तर हाताला १ जागा मिळाली आहे . तर दोन्ही पवारांच्या राष्ट्रवादीला मात्र आपले खाते उघडता आले नाही . विजयी उमेदवारांनी मात्र शहरातून गुलाल उधळत जल्लोष साजरा केला तर अनुचित प्रकार घडू नये म्हणून कळंब पोलिसांनी चोक पोलीस बंदोबस्त ठेवला होता .

## ट्रॅव्हलस मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी न माणिक धोंडीराम डुबल, वय ५२ वर्षे, बेलवडे बुद्रुक ता. कराड जि. सातारा यांचे ट्रॅव्हलस क्र एमएच ५० एन ४४१४ मधील बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे ७ ग्रॅम वजनाचे दागिने, रोख रक्कम १३०० व मोबाईल फोन असा एकुण ४४,३०० किंमतीचा माल दि.२०.१२.२०२५ रोजी ०३.३० ते ०५.३० वा. सु. मुलंची कन्या शाळा तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-माणिक डुबल यांनी दि.२०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पाणबुडी मोटर, व ३० मिटर वायरची अज्ञाताने केली चोरी: गुन्हा दाखल

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-गोविंद पांडुरंग राठोड, वय ६५ वर्षे, रा.बेळंब ता. उमरगा जि. धाराशिव यांचे मुरुम शिवारातील बेळंब शेत गट नं ३५६ मधील पाच एचपीची टेक्सो कंपनीची पाणबुडी मोटर, व ३० मिटर वायर, असा एकुण १८,००० किंमतीचे साहित्य हे दि. १७,१२,२०२५ रोजी १९.०० ते दि. १८.१२.२०२५ रोजी ०७.०० वा. सु.अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गोविंद राठोड यांनी दि.२०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## घरातील कपाटातील ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व चांदीची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-रतन सोमनाथ डोके, वय ५६ वर्षे, रा. शिवाजी नगर भुम ता. भुम जि. धाराशिव या बहिणीला भेटण्यासाठी गेल्या असता त्यांचे राहते घराचे दरवाजाचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.१९.१२.२०२५ रोजी १४.०० वा. सु. तोडून आत प्रवेश करून घरातील कपाटातील ६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व चांदीचा सिक्का असा एकुण १,९०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रतन डोके यांनी दि.२०.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (३), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

# मुरुम नगरपरिषदेवर भाजपचे बापूराव पाटील यांचा एकहाती सत्ता काबीज करुन विजय



मुरूम (सुधीर पंचगल्ले) नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी मतदान प्रक्रिया मंगळवार (ता. २) रोजी पार पडली होती. निकाल मात्र लांबणीवर गेला अखेर रविवारी (ता.२१) रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडली. नगरपालिकेत काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पाटील परिवाराची ५० वर्षापासून एकहाती सत्ता राहिली. यंदाही मुरूम नगरपरिषदेवर प्रथमच भारतीय जनता पार्टीचे कमळ फुलले. पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती करत पाटील परिवाराने एकहाती सत्ता कायम ठेवून ऐतिहासिक वर्चस्व प्रस्थापित केले. ही निवडणूक स्थानिक पातळीवर असल्याने या निवडणुकीत पक्ष नव्हे तर पाटील परिवारावर जनतेचे प्रेम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध होऊन मतदारांनी विजयी केले. पारंपारीक विरोधकांने एकहाती सत्तेचा बुरुज हलवीण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले. जनतेने मात्र त्यांच्या विचाराला नाकारून कमळ फुलवत मतदानरुपी लोकशाहीचा गुलाल पाटील परिवाराला लावून लोकशाहीच्या आढून जनतेचा विश्वास घात करणाऱ्या विरोधकांला मतदानातून मतदारांनी चांगलाच धडा शिकविला. माजी मंत्री तथा भाजप लातूर ग्रामीण चे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार बापूराव पाटील, भाजप युवानेते शरण पाटील, सौ. संपदा शरण पाटील, स्मिताताई बापूराव पाटील व सर्व उमेदवार यांनी प्रत्येक प्रभागात घेतलेल्या कॉर्नर बैठका, प्रचार पदयात्रा आणि त्यामध्ये मिळत असलेला नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद म्हणजे विजयी संदेश देत होते. फक्त निकडणुकीची औपचारिकता बाकी राहिली होती. अखेर तो दिवस उजाडला २१ डिसेंबरला. ३० नोव्हेंबर रोजी शहरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा बसवेश्वर चौक मार्गे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत निघालेल्या पदयात्रेला उसळलेला जनसागर पुन्हा एकहाती सत्तेची साक्षी देत होते. नंतर साठे चौकात माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन काळे सह उपस्थित मान्यवरांच्या पार पडलेल्या विराट सभेत बसवराज पाटील यांनी मुरूमकरांना केलेल्या संभाषणाने विजयावर शिक्कामोर्तब झाला. विरोधकांवर टीका-टिप्पणी करण्यापेक्षा आपण भविष्यात नगरपरिषदेच्या माध्यमातून जो वचननामा निवडणुकीत जनतेसमोर मांडून येणाऱ्या काळात विकासात्मक काम करण्याचा संकल्प अधोरेखित केला. या सभेपासूनच मतदारांना कळले की उच्च विचाराचे राजकारण काय असते. इथूनच मतदारांचे मतपरिवर्तन झाले. पाटील परिवाराच्या माध्यमातून सर्व धार्मियांना मुरूम नगरपरिषदेवर ५० वर्षे कै. माधवराव (काका) पाटील यांच्या हयातीत आणि त्यांच्या पश्चात बसवराज पाटील, बापूराव पाटील यांनी संधी दिली. मात्र या निवडणुकीत पाटील परिवारातील बापूराव पाटील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार होते. यावेळी मतदारांनी उत्स्फूर्तपणे बापूराव पाटलांचा प्रचार करत विजयाची माळ त्यांच्या गळ्यात घातली. विजयी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापूराव पाटील यांनी प्रतिस्पर्धी अजित चौधरी यांच्यापेक्षा ४०१९ मताच्या फरकाने विजय मिळविला. या निवडणुकीतील प्रभागनिहाय विजयी उमेदवार खालील प्रमाणे... प्रभाग एक-अ व ब : स्नेहा राम बंडगर (७२८ मतांनी विजयी),

अमर धनराज भोसले (५३६ मतांनी विजयी), प्रभाग दोन-अ व ब : सचिन गुलाब फनेपुरे (३११ मतांनी विजयी), श्रीदेवी नागप्पा दुर्गे (३९२ मतांनी विजयी), प्रभाग तीन-अ व ब : महादेवी बबन बनसोडे (३१३ मतांनी विजयी), अहमद युनूज मनियार (२४३ मतांनी विजयी), प्रभाग चार-अ व ब

अंकिता राजकुमार अंबुसे (६७० मतांनी विजयी),

निरजानंद सच्चिदानंद अंबर (६९१ मतांनी विजयी), प्रभाग पाच-अ व ब : गौस रशीद शेख (२१० मतांनी विजयी), निर्मला प्रकाश कंटेकुरे (४७१ मतांनी विजयी), प्रभाग सहा-अ व ब : रूपचंद गुंडेराव गायकवाड (२५२ मतांनी विजयी), मुमताजबी मलंग ढोबळे (२०० मतांनी विजयी), प्रभाग सात-अ व ब : ज्योती सुजित शेळके (३४८ मतांनी विजयी),

रमेश दत्तू चव्हाण (१७२ मतांनी विजयी), प्रभाग आठ-अ व ब : सुनिता मारुती बनणे (५५८ मतांनी विजयी), राजेंद्र संभाजी बेंडकाळे (५१२ मतांनी विजय), प्रभाग नऊ-अ व ब : समीना राजाबकसर मुल्ला (१३५ मतांनी विजयी), अजितकुमार अरविंद चौधरी (९ मतांनी विजयी), प्रभाग दहा-अ व ब : रागिनी भारत गायकवाड (३४६ मतांनी विजयी),

सिद्राय्या सायबण्णा ख्याडे (५२२ मतांनी विजयी). मुरूम शहरातील नगरपरिषद निवडणुकीमध्ये नगरसेवक पदाकरिता सर्वात जास्त मतांनी निरजानंद सच्चिदानंद अंबर ६९१ मतांनी विजयी तर सर्वात कमी मतांनी अजितकुमार अरविंद चौधरी ९ मतांनी विजयी झाले. पाटील परिवारातून एक व्यक्ती शहराच्या सेवेसाठी सक्रिय होतो आहे. यात गैर काय ? असा सवाल मतदारांमध्ये निर्माण झाला होता मात्र मतदारांनी पाटील परिवारावर विश्वास दाखवून आपल्याच कुटुंबातील सदस्य असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले. मतदारांनी विरोधकांच्या विचाराला नाकारले आणि कमळ फुलविले. पाटील परिवाराने काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मुरूम नगरपरिषदेवर रचलेले ऐतिहासिक रेकॉर्ड पुन्हा एकदा पाटील परिवारानेच भाजपच्या माध्यमातून एकहाती सत्ता काबीज करून वर्चस्व सिद्ध केले. मुरूम शहरात पक्षाला नव्हे, पाटील परिवाराला पाहून मतदान होते. हे पुन्हा एकदा जनतेने सिद्ध करून जलवा कायम राखला. मतमोजणी प्रसंगी प्रशासकीय व पोलीस यंत्रणा सज्ज होती.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649